वर्ष -1, अंक -20

16 ते 30 एप्रिल 2021, नि:शुल्क

# न्यू इंडिया समाचार




पंचायती राज दिनानिमित्त विशेष


आपली सशक्त-पारदर्शक पंचायती राज व्यवस्था

पृष्ठ 6-7

## राष्ट्रीय चाचणी संस्था

# क्षमतेची योग्य पारख

उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्रवेशासाठी केवळ सैद्धांतिक नव्हे तर बौद्धिक क्षमता चाचपण्याच्या प्रारंभाची कहाणी




- कोरोनाच्या कठीण काळानंतर पुन्हा एकदा परीक्षांचा हंगाम सुरु होत आहे. अशा वेळी नेहमीच विद्यार्थी खूप तणावात असतात. मात्र जर अभ्यास केवळ परीक्षेसाठी नाही तर काहीतरी नवीन शिकण्यासाठी करत असाल तर मग तणाव नाहीसा होतो.
- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे एक्झाम वॉरियर्स हे पुस्तक नेमका हाच विचार आपल्यासमोर मांडत आहे. याची नवी आवृत्ती आली आहे. नमो ॲप सह अमेझॉन वर देखील हे पुस्तक उपलब्ध आहे. या व्यतिरिक्त याची किंडल आवृत्ती देखील प्रसिद्ध केली आहे.
- यावेळी या पुस्तकात विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांकडून प्राप्त बहुमूल्य सूचनांचा देखील यात समावेश करण्यात आला आहे. नवीन भाग समाविष्ट करण्यात आले आहेत , जे विशेषतः आई-वडील आणि शिक्षकांसाठी आवडीचे असतील. पुस्तकात नवीन मंत्र आणि अनेक रोचक घडामोडी आहेत. या पुस्तकात परीक्षेपूर्वीच्या तणावापासून मुक्त राहण्याच्या गरजेवर भर देण्यात आला आहे.

***पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्वीटच्या माध्यमातून म्हटले आहे ...***


*"“एक्झाम वॉरियर्सच्या या आवृत्तीत नवीन मंत्र आणि अनेक रोचक उपक्रम आहेत. हे पुस्तक परीक्षेपूर्वी तणावमुक्त राहण्यात मदत करते. ”*

“

परीक्षेकडे चिंता नाही तर उत्सव म्हणून पहायला हवे. आपण अपयशाकडे अयशस्वी म्हणून पाहू नये. अस्थायी अपयशाचा अर्थ असा नाही की आपण आयुष्यात कधीच यशस्वी होऊ शकत नाही. खरे तर याचा अर्थ असा असू शकतो की सर्वोत्तम येणे अद्याप बाकी आहे. तुमची स्पर्धा दुसऱ्यांशी नाही तर स्वतःशी असायला हवी. सर्व आव्हानांवर मात करून प्रकाशित व्हा, भविष्य तुमच्या पायाशी असेल. चला, हसतमुखाने आणि चिंतेशिवाय आपण परीक्षेला सामोरे जाऊया.

– नरेंद्र मोदी, पंतप्रधान






आपली प्रत आजच नोंदवा.

न्यू इंडिया
समाचार
वर्ष: 01, अंक: 20 |16 ते 30 एप्रिल 2021

संपादक
जयदीप भटनागर,
प्रधान महासंचालक ,
पत्र सूचना कार्यालय , नवी दिल्ली

सल्लागार संपादक
संतोष कुमार
विनोद कुमार

सहाय्यक सल्लागार संपादक
विभोर शर्मा

प्रकाशक आणि मुद्रक :
सत्येन्द्र प्रकाश,
प्रधान महासंचालक , बीओसी
(ब्यूरो ऑफ आउटरीच एंड
कम्युनिकेशन)

मुद्रण: विबा प्रेस प्रायव्हेट
लिमिटेड, सी-66/3,
ओखला औद्योगिक क्षेत्र, फेज-2,
नवी दिल्ली- 110020

संपर्क : ब्युरो ऑफ आउटरीच
अँड कम्युनिकेशन , सूचना
भवन , दुसरा मजला , नवी
दिल्ली-110003
ईमेल- response-nis@pib.gov.in

डिजाइनर
श्याम शंकर तिवारी

आर. एन. आई. नंबर
DELMAR/2020/78830

# आतील पानांवर...


## योग्यतेची कसोटी




**आवरण कथा** | राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या माध्यमातून उच्च शिक्षण संस्थांच्या प्रवेश परीक्षांमध्ये प्रथमच योग्यतेची पारख करण्याची सुरुवात , पृष्ठ 18-24

**महत्वाकांक्षी योजना...**
**इंडिया पोस्ट पेमेंट बँक: आता तुमची बँक, तुमच्या दारी**
पृष्ठ 28-29

**राष्ट्रीय स्क्रॅप धोरण : सर्वांसाठी फायद्याचा सौदा**



सर्वसामान्य माणसाच्या हितासह पर्यावरण संरक्षणाचा विचार
पृष्ठ 10-12

**वृत्त -सार**
देशातील ठळक बातम्या पृष्ठ 4-5

**आपली सशक्त-पारदर्शक पंचायती राज व्यवस्था**
पंचायती राज दिनानिमित्त केंद्रीय मंत्र्यांचा विशेष लेख | पृष्ठ 6-7

**मध्यमवर्गीय कुटुंबाचे जीवन होत आहे सुगम**
राहण्यास योग्य निर्देशांकाच्या माध्यमातून शहरांना मिळाले मानांकन | पेज 8

**ज्यांच्यामुळे जगाला भारतीय सिनेमाची ओळख झाली**
महान चित्रपट दिग्दर्शक सत्यजीत रे यांच्या पुण्यतिथी निमित्त विशेष | पृष्ठ 9

**महिलांची प्रेरणा बनली वेलु, युवकांची ऊर्जा खुदीराम**
भारताच्या दोन महान क्रांतिकारकांचे स्मरण | पृष्ठ 16-17

**वित्तीय संसाधने जमवून विकासाला गती देणारा निर्णय**
केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय | पृष्ठ 25

**लसीकरण आणि आरोग्य सुविधांमध्ये पुढे मार्गक्रमण करत आहे भारत**
कोरोनाविरुद्ध लढ्यात उचललेले महत्वपूर्ण पाऊल | 26-27

**सुविधांचा महामार्ग**
राष्ट्रीय महामार्गांवर सार्वजनिक सुविधांचा विचार | पृष्ठ 30-31

**चिरंजीवी: भारत-बांग्लादेश मैत्री**
बांग्लादेशच्या स्वातंत्र्याच्या 50 व्या वर्षपूर्तीनिमित्त पंतप्रधानांचा दौरा | पृष्ठ 32-35

**सदैव देशाच्या सेवेत...**
प्रशासकीय सेवा दिनानिमित्त विशेष | पृष्ठ 36-37

**आयुष्य आणि पर्यावरण वाचवण्यासाठी अनोखा पुढाकार**
कहाणी बदलत्या भारताची | पृष्ठ 38

**67 वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार**
चित्रपट पुरस्कारांची घोषणा | पृष्ठ 39

**पंतप्रधानांच्या मन की बात कार्यक्रमाचा 22 वा भाग**
| पृष्ठ 40



**जल सुशासनातून जल संरक्षणाचा भगीरथ संकल्प**
जल संरक्षणाच्या दिशेने लोकसहभागासह 'कैच द रेन' स्वरूपात महासंकल्पाची सुरुवात | पृष्ठ 13-15

# संपादकांच्या लेखणीतून ...

सादर नमस्कार

तुम्ही तुमच्या 'पाक्षिकाला' अपार स्नेह देत आहात. कोरोना काळातही सफलतेचे अनेक नवे आयाम स्थापित करत देश नव्या संकल्पांसह पुढे वाटचाल करत आहे. गेल्या वर्षी विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही आपला अभ्यास -शिक्षणाची गती थांबू दिली नाही. नवीन तंत्रज्ञानाने यात महत्वाची भूमिका पार पाडली आहे. आता परीक्षांचा हंगाम सुरु आहे, अशा वेळी प्रत्येक क्षेत्राप्रमाणे परीक्षेच्या बाबतीतही केंद्र सरकारने 2017 मध्ये एक क्रांतिकारी बदल केला होता. इंग्रजांच्या राजवटीत लॉर्ड मैकाले यांनी भारतीयांना केवळ कारकून बनवण्यावर भर देणारी शिक्षण पद्धती सुरु केली होती, मात्र स्वातंत्र्यानंतर इतकी वर्ष लोटूनही यात बदल घडवून आणण्यासाठी मोठा पुढाकार कधी घेतला गेला नाही.

अशा रीतीने केंद्र सरकारच्या प्रयत्नांनी आंतरराष्ट्रीय मानकांवर आधारित राष्ट्रीय चाचणी संस्था म्हणून एक तज्ञ संस्था मे 2018 मध्ये अस्तित्वात आली, जिने केवळ तीन वर्षात वैज्ञानिक दृष्टिकोनासह योग्यता आणि क्षमतेची योग्य ओळख असलेली व्यवस्था उभारली आहे. ऑनलाइन प्रणालीच्या महत्वाची जाणीव कोरोना काळाने सर्वांना योग्य प्रकारे करून दिली आहे. हेच कारण आहे ज्यामुळे कोरोना काळातही परीक्षा झाल्या आणि विद्यार्थ्यांचे वर्ष वाया गेले नाही.

यावेळच्या अंकात राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या सफलतेसंदर्भात तिची गरज आवरण कथा बनली आहे. ही संस्था केवळ परीक्षा घेत नाही, शिक्षणाच्या पद्धती, व्यवहारिकतेत बदलाचा आधार देखील बनत आहे, जो देशाच्या नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा केंद्र बिंदू आहे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या शृंखलेत अपरिचित नायकांची गाथा, पंतप्रधानांच्या बांग्लादेश दौऱ्यामुळे शेजारी देशांबरोबर संबंधांच्या नव्या युगाची सुरुवात, मध्यम वर्गाच्या जीवनातील बदलाचा निर्देशांक, स्क्रॅप धोरणामुळे वाहन मालकांना तिहेरी लाभ, टपाल बँकांमुळे ग्रामीण लोकांमध्ये बचतीला चालना, महामार्गाच्या कडेला लोकांसाठी सुविधा, बाजारपेठांच्या विकासासाठी महत्वाकांक्षी योजना आणि भारतीय सिनेमाला जगात ओळख मिळवून देणाऱ्या सत्यजीत रे यांची गोष्ट देखील या अंकात समाविष्ट आहे.

नेहमीप्रमाणे आपला स्नेह आणि सूचना देत रहा.

**पता- ब्यूरो ऑफ आउटरीच अँड कम्युनिकेशन,**
**सूचना भवन, दुसरा मजला,**
**नवी दिल्ली- 110003**

जयदीप भटनागर

**(जयदीप भटनागर)**




# तुमच्या प्रतिक्रिया

न्यू इंडिया समाचार नावाचे सुंदर पाक्षिक प्रकाशित केल्याबद्दल हार्दिक अभिनंदन. याच्या ताज्या अंकात विविध विषय उदा. कोट्यवधी चेहऱ्यांवर उमटले हसू, परदेशी बाजारात आपली छाप पाडण्यास तयार, स्वदेशी खेळणी, क्लस्टरच्या माध्यमातून परंपरा जिवंत ठेवण्याची मोहीम, लस विश्वासाची, गरीब कल्याण अभियान, जागतिक बाजारात भारताचा हिस्सा, हसत खेळत ज्ञान आणि संदेश यावर लेख प्रकाशित करण्यात आले आहेत. हे सर्व लेख वाचून आपल्याला खूपच ज्ञानवर्धक माहिती प्राप्त झाली आहे.-

-चौधरी शक्ति सिंह , वकील shaktisinghadv@gmail.com

ही अतिशय अभिमानाची बाब आहे की आज स्वदेशी खेळण्यांचा बाजार सर्वोत्कृष्टतेच्या शिखरावर पोहचला आहे. आपला भारत आज नि:संदेहपणे असंख्य कुटुंबांना आत्मनिर्भर बनण्याची संधी देत आहे. हो, आपण स्वाभिमानाने म्हणू शकतो की आमचा देश जगात अनोखा आहे. इथे सबका साथ, सबका विकास शक्य आहे. न्यू इंडिया समाचार पाक्षिक वाचून मन संतुष्ट झाले. !

जयंत तपादार

topadarj023@gmail.com

खेळणी उद्योगाला समर्पित या अंकात प्राचीन स्वदेशी खेळांबाबत खूपच रंजक माहिती मिळाली. विशेषत: भारतात, खेळणी उद्योगाला आत्मनिर्भर बनवणारी मोहीम जर योग्य दिशेने पुढे गेली तर बऱ्याच प्रमाणात परदेशी खेळण्यांवरील आपले अवलंबत्व कमी होईल. ही गोष्ट देखील खास वाटली कीं तुम्ही कमी जागेत जास्तीत जास्त माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. धावत्या मजकुराऐवजी जास्त पॉइंटरचा वापर चांगला वाटला.

ममता सिंह mamta.07.07@gmail.com

तुमच्या पाक्षिकाची डिजिटल आवृत्ती पाहून मन प्रफुल्लित झाले. खेळणी उद्योगात भारताच्या आत्मनिर्भरतेबाबत सखोल विश्लेषणात्मक विवेचनाबद्दल आभारी आहे. निश्चितच ही आवृत्ती संग्रही ठेवण्यासारखी आहे. पुढचे अंक देखील वाचायला सुलभ असतील अशी आशा आहे.

मोहित सोनी

sonimohit895@gmail.com

न्यू इंडिया समाचार एक ज्ञानवर्धक पाक्षिकासह देशाला जागरूक करणारी एक प्रक्रिया आहे. देशाला खेळणी उद्योग क्षेत्रात मजबूत बनवण्याची सरकारची कृती योजना खूपच प्रशंसनीय आहे. या पाक्षिकाचे वैशिष्ट्य आहे की ते सर्व भाषांमध्ये उपलब्ध आहे

संध्या निगम

sannigam11@gmail.com

हे एक खूपच प्रशंसनीय पाऊल आहे. आपल्याला भारतीय खेळणी उद्योगाला संपूर्ण जगात स्थान मिळवून द्यायचे आहे. यामुळे इथल्या कारागीरांचे कौशल्य उजळून निघेल.

शैलेन्द्र कुमार

nhpcindia1@gmail.com

मी न्यू इंडिया समाचार पाक्षिकाचा नियमित वाचक आहे. या पाक्षिकाच्या माध्यमातून आपल्याला केंद्र सरकारच्या योजना, कार्यक्रम, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घटनांची नवीन माहिती मिळते. हे पाक्षिक स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी अत्यंत उपयुक्त आहे. माझी एक सूचना आहे की या अंकाचे पाक्षिक ऐवजी साप्ताहिक प्रकाशन करण्यात यावे.

सर्वेश कुमार sarvesh.kr@rb.nic.in

न्यू इंडिया समाचार वाचून खूप छान वाटले. देशातील सर्व प्रमुख बातम्यांबरोबरच आणखी खूप माहिती मिळाली. स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना चालू घडामोडींबाबत माहिती मिळवण्यासाठी हा एक चांगला पर्याय आहे.

पवन राज कुशवाहा pavanraj282000@gmail.com

पाक्षिकाचा नवीन अंक वाचला, आवडला. या पाक्षिकाचे सर्व अंक वाचले आहेत, नेहमीच नवीन अंकाबाबत उत्सुकता वाटत असते. खेळण्यांबाबत वाचले, खूप छान वाटले. हे पाक्षिक माझ्या कुटुंबाला देखील खूप आवडते.

-मनीष कुमार manishk.d089501@gov.in

## आता डिजिटल कॅलेंडर




भारत सरकारने प्रथमच डिजिटल कॅलेंडर आणि डायरी ऍप सुरु केले आहे. जीओआय ऍपवर सर्व सरकारी योजना, कार्यक्रम, प्रकाशनासह, अधिकृत सुट्ट्या आणि तारखांची माहिती देखील मिळेल.

हे गुगल प्ले स्टोर आणि आईओएस वरून डाउनलोड करु शकता.

गुगल प्ले स्टोर लिंक
https://play.google.com/store/apps/details?id=in.gov.calendar

आईओएस लिंक
https://apps.apple.com/in/app/goi-calendar/id1546365594

https://goicalendar.gov.in/

# जुने दिवे देऊन 10 रुपयांत नवीन एलईडी दिवे गावकऱ्यांना घेता येतील




देशातील प्रत्येक घरात वीज पोहचवण्याचे स्वप्न पूर्ण करणा*या केंद्र सरकारने स्वस्त आणि चांगल्या प्रकाशाच्या दिशेने आणखी एक नवे पाऊल उचलले आहे. ग्राम उजाला कार्यक्रमाअंतर्गत ग्रामीण क्षेत्रांमध्ये आता लोक आपले जुने फिलामेंट वाले दिवे देऊन केवळ 10 रुपयांमध्ये नवीन एलईडी दिवे घेऊ शकतील. एका कुटुंबाला 7 आणि 12 वॉटचे जास्तीत जास्त 5 एलईडी दिवे मिळतील. केंद्रीय ऊर्जा राज्य मंत्री(स्वतंत्र प्रभार) आरके सिंह यांनी बिहारच्या आरा जिल्ह्यातून याची सुरुवात केली आहे. पहिल्या टप्प्यात आरा बरोबरच वाराणसी, विजयवाड़ा, नागपुर आणि पश्चिम गुजरातमध्ये 1.5 कोटी एलईडी वितरित केले जातील. एवढेच नाही, ग्राम उजाला कार्यक्रम ही अशी पहिलीच योजना आहे ज्यात वित्तीय व्यवस्थापन कार्बन क्रेडिटच्या माध्यमातून केले गेले आहे. आता या एलईडी दिव्यांच्या माध्यमातून दरवर्षी 202.5 कोटी यूनिट(किलोवाट /तास) विजेची बचत होईल, शिवाय कार्बन उत्सर्जनात देखील 16.5 लाख टन घट होईल. देशातील 3 कोटी 70 लाख घरांमध्ये आधीपासूनच एलईडी दिव्यांचा उपयोग केला जात आहे. यातून दरवर्षी 3.80 कोटी टन कार्बन उत्सर्जनात घट झाली आहे.

## 1 कोटीहून अधिक शेतकऱ्यांना मिळाला एमएसपी दराने धान्य खरेदीचा लाभ

अन्नदात्याला त्याच्या पिकाला योग्य भाव मिळावा हे आपले उद्दिष्ट पूर्ण करण्यात केंद्र सरकार अजिबात कसर सोडू इच्छित नाही. खरीप हंगामात धान्य खरेदीचे ताजे आकडे देखील या गोष्टीची साक्ष देत आहेत. 21 मार्च पर्यंत 21 राज्यांच्या 100.92 लाख शेतक*यांकडून किमान हमी भावाने 685.39 लाख मेट्रिक टन धान्याची खरेदी करण्यात आली आहे, तर याच अवधीत गेल्या वर्षी 603.79 लाख मेट्रिक टन धान्य खरेदी करण्यात आले होते. म्हणजेच यावर्षीआतापर्यंत 13.51% अधिक धान्य एमएसपी नुसार खरेदी केले आहे. एकट्या पंजाबमधून 202.82 लाख मेट्रिक टन धान्य खरेदी झाली , हे संपूर्ण खरेदीच्या 29.59% आहे. शेतक*यांना किमान हमी भावापोटी 1,29,402.60 कोटी रुपये देण्यात आले. खरीप 2020-21 आणि रबी 2021 अंतर्गत सरकारने एमएसपी नुसार 3,60,238.73 मेट्रिक टन मूग, उडीद, तूर, शेंगदाण्याच्या शेंगा आणि सोयाबीनची खरेदी केली आहे. तर 18,97,005 शेतक*यांकडून 26,719.51 कोटी रुपये एमएसपी दराने कापसाच्या 91,86,803 गासड्या खरेदी करण्यात आल्या आहेत.

## मेरा राशन ॲपच्या माध्यमातून देशात कुठेही घ्या आपल्या हक्काचे रेशन

प्रस्थलांतरित कामगारांचे जीवन सुलभ बनवण्यासाठी आता केंद्रीय खाद्य आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयाने नवीन पुढाकार घेतला आहे. कामगारांना काम करण्यासाठी अनेकदा दुस*या राज्यांमध्ये जावे लागते, अशा वेळी सरकारी स्वस्त धान्य त्यांना खरेदी करता यावे यासाठी MERA RATION मोबाइल ॲपची सुरुवात करण्यात आली आहे. या ॲपच्या मदतीने कोणत्याही राज्यात कोणत्याही दुकानातून रेशन घेता येऊ शकेल. आधारक्रमांकाच्या पडताळणीसह हे ॲप इंग्रजी आणि हिंदी भाषेत उपलब्ध आहे आणि लवकरच 14 अन्य भारतीय भाषांमध्येही ते उपलब्ध होईल. या ॲपवरून जवळच्या दुकानाबाबत माहिती मिळवता येऊ शकते. हे ॲप केंद्र सरकारच्या एक देश-एक शिधापत्रिका योजनेचा भाग आहे. या योजनेची सुरुवात ऑगस्ट 2019 मध्ये चार राज्यांमध्ये करण्यात आली होती. सध्या 32 राज्ये आणि केंद्र शासित प्रदेशांमध्ये याचा लाभ मिळत आहे. रेशन कार्ड पोर्टेबिलिटीचा लाभ आतापर्यंत 69 कोटी लोकांनी घेतला आहे. दर महिन्याला सुमारे 1.5 कोटी लोक यात सहभागी होत आहेत.



# अटल टिंकरिंग लॅबच्या विद्यार्थ्यांना क्लाउड कंप्यूटिंगची युक्ती शिकवणार अमेझॉनवेब सर्विस


विद्यार्थी आणि युवकांच्या स्वप्नांना अनोख्या आविष्कारात बदलणारी कहाणी आता तुम्ही अनेकदा पाहिली, ऐकली किंवा वाचली असेल. चार वर्षांपूर्वी केंद्र सरकार द्वारा सुरु करण्यात आलेल्या अटल इनोवेशननेया विद्यार्थी आणि युवकांच्या वैज्ञानिक स्वप्नांना नवे पंख दिले आहेत. मुलांना शाळांमध्येच संशोधक बनवण्याच्या उद्देशाने अटल टिंकरिंग लैबच्या माध्यमातून आज भारतातील 7000 पेक्षा अधिक शाळांमध्ये मुलांच्या नवसंशोधनाला नवी दिशा दिली जात आहे. सफलतेच्या या मालिकेत आता आणखी एक नवी सुरुवात होणार आहे. अटल टिंकरिंग लैबचे हे विद्यार्थी आताअमेझॉन वेब सर्विसच्या माध्यमातून क्लाउड कंम्प्यूटिंगच्या युक्त्या शिकतील. नीति आयोगाने यासाठी करार केला आहे. अटल इनोवेशन मिशनचे मिशन संचालक आर रमनन यांच्या मते याकरारामुळेअमेझॉन वेब सर्विस देशाच्या प्रतिभावान विद्यार्थ्यांना डिजिटल आणि वेब आधारित तंत्र शिकवेल जेणेकरून त्यांच्या सर्जनशील आणि संशोधन क्षमतेत वाढ होऊ शकेल.

## अटल पेंशन योजनेशी वर्षभरात 65 लाख लोक जोडले गेले




म्हातारपणी आर्थिक अडचणींचा सामना करावा लागू नये ही चिंता प्रत्येकाला वाटत असते. हीच चिंता दूर करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 1 जून 2015 रोजी सुरु केलेल्या अटल पेंशन योजनेचे उत्तम परिणाम मिळाले आहेत. पेन्शन क्षेत्राचे नियामक पेन्शन फंड रेग्युलेटर अँड डेवलपमेंट द्वारा जारी आकडेवारीनुसार फेब्रुवारी 2021 पर्यंत 2 कोटी 72 लाख 69 हजार लोकांनी अटल पेन्शन योजनेत खाते उघडले होते. गेल्या वर्षी फेब्रुवारी महिन्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत या योजनेच्या खातेधारकांची संख्या 2 कोटी 7 लाख 41 हजार इतकी होती. या योजनेअंतर्गत लाभार्थींचे वय 60 वर्ष झाल्यानंतर 1,000 रुपये ते 5,000 रुपयांपर्यंत रक्कम पेन्शन म्हणून दर महिन्याला दिली जाईल. लाभार्थींनी केलेली गुंतवणूक आणि त्यांच्या वयानुसार ही रक्कम निश्चित केली जाते. अटल पेंशन योजनेत तुम्ही कमी पैसे भरून दर महिन्याला जास्त पेन्शन मिळवण्यास पात्र ठरू शकता तसेच अचानक मृत्यू झाल्यास निवृत्तिवेतन धारकाच्या कुटुंबाला देखील याचा लाभ मिळू शकतो.

## बंगळुरूमध्ये उभे राहिले देशातील पहिले मध्यवर्ती वातानुकूलित रेल्वे टर्मिनल



विमानतळांप्रमाणेच आता रेल्वे स्थानके देखील आधुनिक बनवली जात आहेत. याच अनुषंगाने भारतीय रेल्वेने बंगळुरूमध्ये देशातील पहिले मध्यवर्ती वातानुकूलित रेल्वे टर्मिनल उभारून विकासाची आणखी एक झलक दाखवली आहे. जागतिक दर्जाच्या सुविधा पुरवण्यास कटिबद्ध रेलवेने या टर्मिनलचे नामकरण देशातील अग्रणी सिविल इंजीनियर्सपैकी एक भारतरत्न सर एम.विश्वेश्वरय्या यांच्या नावाने केले आहे. या रेल्वे टर्मिनलवर लवकरच परिचालन सुरु होईल. सुमारे 314 कोटी रुपये खर्चासह हे स्थानक 4200 चौरस मीटर परिसरात उभारले आहे आणि इथून 50 हजार लोकांची वर्दळ सहजपणे होऊ शकेल. खरे तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय रेल्वे नित्य नवी उंची गाठत आहे. देशात हे प्रवासाचे एक लोकप्रिय माध्यम आहे. भारतीय रेल्वे सातत्याने रेल्वे प्रवाशांना प्रवासाचा उत्तम अनुभव देण्यासाठी अशा प्रयत्नांवर भर देत आहे.

# आत्मनिर्भर भारताचा मार्ग सुकर करणारी आपली सशक्त-पारदर्शक पंचायती राज व्यवस्था



**नरेन्द्र सिंह तोमर**
ङ्पंचायती राज, ग्रामीण विकास, कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री, भारत सरकार

> सशक्त,संसाधनांनी युक्त आणि पारदर्शक पंचायती राज व्यवस्था आत्मनिर्भर भारताच्या संकल्प सिद्धिचा मार्ग आहे.

भारतात पुन्हा एकदा रामराज्य स्थापन करण्याचे जे स्वप्न राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी पाहिले होते त्याचा पाया रचण्यात देशातील सव्वा लाखांहून अधिक गावांमध्ये सशक्त पंचायती राज व्यवस्थेद्वारे ग्रामीण विकासाचे एक सुनियोजित मॉडल हा देखील एक घटक होता. गांधीजी नेहमी म्हणायचे की खरी लोकशाही राजधानीत बसून राज्य कारभार चालवून येत नाही तर गावातील प्रत्येक व्यक्तीच्या सहकार्याने चालते.

प्राचीन काळापासून आपल्या देशात गावांचा विकास आणि तेथील सामाजिक सलोखा कायम राखण्यात पंचायतींची महत्वाची भूमिका राहिली आहे. भले या पंचायतीची कुठलीही घटनात्मक व्यवस्था नसेल, मात्र पंच आणि पंचायती गावांमध्ये विकासाबरोबरच परस्परातील विवाद सोडवण्याचा एक मजबूत स्तंभ राहिला आहे. भारतावर शेकडो वर्ष परदेशी आक्रमण झाले, मात्र तमाम प्रयत्न करूनही आक्रमणकर्त्यांना आपली सशक्त ग्रामीण अर्थव्यवस्था, गावांमध्ये पंचायतींच्या माध्यमातून खोलवर रुजलेल्या सामाजिक समरसता आणि एकतेची तत्वे तोडू शकले नाहीत. खुद्द इंग्रज व्हॉईसरॉय लॉर्ड रिपन प्राचीन भारतीय पंचायती राज व्यवस्थेचे प्रशंसक होते आणि त्यांनी 1882 मध्ये भारतात ग्रामीण स्तरावर ज्या स्थानिक स्वशासनाची सुरुवात इंग्रज राजवटीत केली ती आपल्या प्राचीन पंचायती राज व्यवस्थेवरच आधारित होती.

राज्य घटनेच्या 73 व्या दुरुस्तीच्या माध्यमातून देशात पंचायती राज व्यवस्थेला एक पायाभूत आणि अधिकार संपन्न चौकट प्रदान करण्यात आली आहे. 24 एप्रिल 1993 रोजी हा कायदा देशात लागू झाला आणि म्हणूनच आपण हा दिवस पंचायती राज दिवस म्हणून साजरा करतो. देशातील 2,55,487 ग्राम पंचायती आणि सुमारे साडे सात हजार मध्यवर्ती आणि जिल्हा पंचायतीची घटनात्मक अधिकार प्राप्त चौकट जगातील सर्वात मोठ्या लोकशाही व्यवस्थेचा मजबूत आधार स्तंभ बनते. दर पाच वर्षांनी गावकरी आपल्या मतांद्वारे आपल्या गावातील सरकार निवडते आणि महिला सशक्तिकरणाचे यापेक्षा मोठे उदाहरण काय असेल जिथे देशातील 31.65 लाख निर्वाचित लोकप्रतिनिधींमधून सुमारे 46 टक्के म्हणजेच 14.53 लाख आपल्या भगिनी आहेत, ज्या पूर्ण क्षमतेने आणि कुशलतेने गावांमधील प्रशासन चालवतात.

24 एप्रिल 2020 रोजी गेल्या वर्षी पंचायती राज दिवस कोविड-19 ची प्रतिकूल परिस्थिती आणि लॉकडाउनच्या पार्श्वभूमीवर साजरा करण्यात आला होता. त्यावेळी आपले यशस्वी पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी देशाच्या पंचायत प्रतिनिधींशी व्हर्चुअल माध्यमातून संवाद साधताना देशातील गावांना दोन मोठ्या भेट दिल्या होत्या. पंतप्रधानांनी त्यादिवशी ज्या 'स्वामित्व' महात्वाकांक्षी योजनेचा शुभारंभ केला होता ती स्वातंत्र्यानंतर आतापर्यन्त गावांची पायाभूत व्यवस्था मजबूत आणि सुस्थापित करण्यात सर्वात मोठे पाऊल आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जन्म जयंतीच्या 151 व्या वर्षात गावांमध्ये राहणाऱ्या 83 कोटींहून अधिक गावकऱ्यांना त्यांच्या संपत्तीचा अधिकार प्रदान करणे ही बापूंना खऱ्या अर्थाने श्रद्धांजलि आहे. गावकऱ्यांकडे त्यांची घराची

अशी कोणतीही कागदपत्रे नव्हती, जी हा दावा करू शकतील की तेच याचे मालक आहेत. स्वामित्व योजनेअंतर्गत ड्रोन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून तयार होत असलेले गावांचे डिजिटल नकाशे केवळ गावकऱ्यांना त्यांच्या संपत्तीचा अधिकार प्रदान करणार नाहीत तर देशातील प्रत्येक गावाच्या सुनियोजित विकासाचा पाया देखील बनतील. गेल्या वर्षी 6 राज्यांमध्ये प्रायोगिक स्वरूपात प्रारंभ करण्यात आलेल्या स्वामित्व योजनेची संपूर्ण देशात अंमलबजावणी करण्याचा निर्णय यावर्षी केंद्रीय अर्थसंकल्पात घेण्यात आला आहे. मागच्या पंचायती राज दिनी पंतप्रधानांनी एकीकृत ई-ग्राम स्वराज पोर्टल आणि त्याच्या मोबाइल ॲपचा देखील शुभारंभ करून पंचायतींमध्ये एक पारदर्शक आणि त्वरित व्यवस्थेची सुरुवात देखील केली होती.

मागील पंचायती राज दिनी पंतप्रधानांनी कोरोना विरोधात लढाई लढण्यासाठी जो मंत्र पंचायत लोक प्रतिनिधींबरोबर झालेल्या आपल्या संवादात दिला होता, त्याच आधारावर पंचायतींनी कोविड-19 संक्रमण रोखण्यासाठी आणि संकटाच्या या काळात बेरोजगार होऊन आपल्या गावी परत आलेल्या स्थलांतरित कामगार आणि अन्य प्रभावित लोकांना जे सहकार्य आणि मदत प्रदान केली आहे ती अत्यंत प्रशंसनीय आहे. संकटाच्या या काळात मनरेगा आणि गरीब कल्याण रोजगार योजनेने गावांमध्ये प्रत्येक गरीब आणि गरजवंताला रोजगार प्रदान करून एक नवीन इतिहास लिहिला आहे. गेल्या वित्तीय वर्षात मनरेगा अंतर्गत विक्रमी 387.66 कोटी मनुष्य दिवस रोजगार निर्मिती झाली आणि सव्वा अकरा कोटींहून अधिक ग्रामीण जनतेला रोजगार मिळाला. त्याचप्रमाणे गरीब कल्याण रोजगार योजने अंतर्गत 50.78 कोटी मनुष्य दिवस रोजगार निर्मिती झाली.

आपण सातत्याने सशक्त, पारदर्शक, प्रभावी आणि लोककल्याणासाठी समर्पित पंचायती राज व्यवस्थेच्या दिशेने पुढे जात आहोत. पंचायतींना आर्थिक दृष्ट्या सशक्त करून गावांच्या विकासात केंद्रीय वित्त आयोगाची भूमिका सर्वात महत्वपूर्ण राहिली आहे. चौदाव्या वित्त आयोग (वर्ष 2015-2020) अंतर्गत 2 लाख 292 कोटी रुपये निधी ग्राम पंचायतीना देण्याची शिफारस करण्यात आली, जी तेराव्या वित्त आयोगापेक्षा तीन पट अधिक होती. वित्तीय वर्ष 2020-21 मध्ये पंधराव्या वित्त आयोगाच्या अंतरिम शिफारसीअंतर्गत 60750 कोटी रुपयांची शिफारस करण्यात आली जी आतापर्यंतची सर्वात जास्त वार्षिक तरतूद आहे आणि सरकारने ती पूर्णपणे स्वीकारली आहे.

पंधराव्या वित्त आयोगाच्या (वर्ष 2021-2026) शिफारशींमध्ये स्थानिक ग्रामीण संस्थांसाठी 2,36,805 कोटी रुपयांचा निधी प्रदान करण्याची शिफारस करण्यात आली आहे. त्याचबरोबर ग्रामीण क्षेत्रात आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी 43,928 कोटी रुपये स्वतंत्रपणे देण्याची शिफारस देखील आयोगाने केली आहे. भारत सरकारने या शिफारशी पूर्णपणे स्वीकारल्या आहेत.



**वर्तमानाप्रमाणेच भविष्यातील गरजा लक्षात घेऊन गावांमध्येही शहरांप्रमाणे सुनियोजित विकासावर भर दिला.**

गावांचा सुनियोजित विकास आणि वित्त आयोगाच्या निधीच्या पारदर्शक वापरासाठी देशातील 96 टक्के ग्राम पंचायतीं द्वारा ग्राम पंचायत विकास योजना (GPDP) आखून ती लागू करणे आणि या वर्षांपासून जिल्हा आणि मध्यवर्ती पंचायतींद्वारा देखील विकास योजनांची निर्मिती हेच सिद्ध करते की गावे देखील आता शहरांप्रमाणे एका सुनियोजित विकासाच्या दिशेने पुढे जात आहेत जिथे वर्तमानासह भविष्याच्या गरजा ध्यानात घेतल्या जात आहेत. ग्राम पंचायत विकास योजना राजधानीत तयार होत नाहीत तर जन योजना अभियानाच्या माध्यमातून गावांमध्येच तयार केल्या जात आहेत.

माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी वर्ष 2018 मध्ये पंचायती राज दिवसानिमित्त राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानाचा (RGSA) शुभारंभ केला होता. निर्वाचित प्रतिनिधी आणि पंचायतींच्या अन्य हितधारकांना प्रशिक्षणाच्या माध्यमातून क्षमता निर्मितीसाठी सरकारचे हे पाऊल मैलाचा दगड सिद्ध झाले आहे. वर्ष 2018 पासून केंद्रीय वित्त आयोगाच्या निधीच्या वापरासाठी प्रिया सॉफ्ट (Panchayati Raj Institutions Accounting Software) चा प्रभावी उपयोग, वित्त आयोगाच्या निधीतून निर्मित प्रत्येक मालमत्तेचे जियो टैगिंग आणि फोटो अपलोड करणे यासारख्या प्रक्रियाद्वारे पंचायती राज व्यवस्था पूर्णपणे पारदर्शक बनली आहे. ई-ग्राम स्वराज एप्लीकेशनच्या माध्यमातून पंचायतींच्या कामकाजात गती आली आहे तसेच प्रत्येक कामाचे रिपोर्टिंग, ट्रैकिंग आणि मॉनिटरिंग देखील सुलभ झाले आहे. 23 राज्यांमध्ये 14 व्या वित्त आयोगाच्या खात्यांचे ऑनलाइन ऑडिटचे काम सुरु झाले आहे. देशाची राजधानी दिल्ली पासून सुदूर गावांमधील पंचायतींमधील अंतर माहिती तंत्रज्ञानाच्या या युगात कमीच नव्हे तर जवळपास समाप्तच झाले आहे. दिल्लीतून जरी आता शंभर रुपये जारी झाले तरी त्यातील एक-एक पैचा वापर गावांचा विकास आणि कल्याणासाठी केला जातो. गेल्या सात वर्षांमध्ये सरकार द्वारा करण्यात आलेल्या प्रभावी सुधारणांमुळे तळागाळापर्यंत लोकशाहीचे मजबुतीकरण झाले आहे. पंतप्रधान नेहमी म्हणतात की आत्मनिर्भर गावेच आत्मनिर्भर भारताची निर्मिती करू शकतात. सशक्त, संसाधनांनी युक्त आणि पारदर्शक पंचायती राज व्यवस्था आत्मनिर्भर भारताच्या संकल्पाच्या सिद्धीचा मार्ग आहे.



# मध्यमवर्गीय कुटुंबाचे जीवन बनत आहे सुगम


> *मध्यमवर्गीयांमध्ये चमत्कार करण्याची ताकद असते. जीवन सुलभतेचा सर्वात मोठा लाभ कुणाला होणार असेल तर तो माझ्या मध्यवर्गीय कुटुंबांना होणार आहे. स्वस्त इंटरनेट असेल, स्वस्त स्मार्टफोन असेल किंवा उड़ान अंतर्गत विमानाचे तिकीट खूप स्वस्त होणे असेल किंवा आपले हायवे किंवा इंफर्मेशन-वेज असतील, या सर्व गोष्टी मध्यम वर्गाचे सामर्थ्य वाढवणाऱ्या आहेत.*
>
> —— नरेंद्र मोदी, प्रधानमंत्री

**ईज ऑफ लिविंग इंडेक्स- 2020 ने सांगितले आहे कोणते शहर जीवन जगण्याच्या सुगम्यतेच्या बाबतीत अव्वल आहे आणि कुठे सरकारच्या पुढाकारातून शहर-नगरपालिकांचा विकास त्याला स्मार्ट सिटी बनवत आहे , विशेषतः मध्यम वर्गाच्या जीवन स्तरात आमूलाग्र बदल घडवत आहे. स्मार्ट सिटीचा अर्थ आहे - शहरांचा पुनरुद्धार, सुशासन, उत्तरदायित्व आणि जीवन सुलभता**

ईज ऑफ लिविंग म्हणजेच जीवन जगण्याची सुगम्यता लोकालोकांपर्यंत कशी पोहचेल, यासाठी योजना आखणे एवढेच नाही तर त्यामुळे सामान्य लोकांना कसे वाटते हे जाणून घेण्याची ईज ऑफ लिविंग इंडेक्स ही एक पद्धत आहे, ज्याच्या माध्यमातून एकीकडे जीवनाची गुणवत्ता आणि शहरांच्या विकासाचे खरे चित्र दिसते, त्याचबरोबर सरकारकडून पुरवल्या जाणा या सेवांच्या बाबतीत लोकांचा दृष्टिकोन देखील समजतो. केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी विकास मंत्री हरदीप सिंह पुरी यांनी मार्च महिन्यात ऑनलाइन आयोजनात 2020 साठी ईज ऑफ लिविंग इंडेक्स (जीवन सुलभता निर्देशांक ) बरोबरच नगरपालिका कामगिरीची अंतिम क्रमवारी प्रसिद्ध केली. निर्देशांक 2020 मध्ये त्या शहरांसाठी घोषणा करण्यात आल्या ज्यांची लोकसंख्या 10 लाखांपेक्षा अधिक आणि 10 लाखांपेक्षा कमी आहे. वर्ष 2020 मध्ये आयोजित स्पर्धेत 111 शहरांमधील 32 लाखांहून अधिक लोकांनी भाग घेतला होता. व्यवसाय सुलभतेबरोबरच जीवन सुलभतेवर देखील पंतप्रधान सातत्याने भर देत आले आहेत. या निर्देशांकाचा उद्देश शिक्षण , आरोग्य , गृहनिर्माण, मनोरंजन, सुरक्षा, आर्थिक विकास, पर्यावरण, वीज वापर यासारख्या 13 श्रेणींमधील 49 संकेतकांसह जीवनाच्या गुणवत्तेचे विश्लेषण करणे हा आहे.

## अव्वल 10 शहरे
(10 लाख से अधिक आबादी)

01 बेंगलुरु
02 पुणे
03 अहमदाबाद
04 चेन्नई
05 सूरत
06 नवी मुंबई,
07 कोयंबटूर
08 वडोदरा
09 इंदौर
10 ग्रेटर मुंबई



## अव्वल 10 शहरे
(10 लाखांहून कमी लोकसंख्या )

01 शिमला
02 भुवनेश्वर
03 सिलवासा
04 काकीनाडा
05 सलेम
06 वेल्लोर
07 गांधीनगर
08 गुरुग्राम
09 दावणगेरे
10 तिरुचिरापल्ली

## अव्वल नगर पालिका


*10 लाखांहून अधिक लोकसंख्या असलेल्या नगरपालिकांमध्ये इंदूर पहिल्या क्रमांकावर आहे. त्यानंतर सूरत आणि भोपाळ दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावर आहेत. तर 10 लाखांपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या श्रेणीत नवी दिल्ली अव्वल स्थानी आहे. त्यानंतर तिरुपति आणि गांधीनगर यांचा क्रमांक आहे.*



# सत्यजीत रे

## ज्यांच्यामुळे जगाला भारतीय सिनेमाची ओळख झाली

**जगातील महान चित्रपट दिग्दर्शकांपैकी एक अकिरो कुरोसोवा म्हणाले होते - सत्यजीत रे यांच्या चित्रपटांबाबत जाणून न घेणे म्हणजे सूर्य आणि चंद्र विरहित जगात राहणे आहे. महान चित्रपट दिग्दर्शक सत्यजीत रे यांनी 23 एप्रिल रोजी जगाचा निरोप घेतला होता. मागे राहिले 'पथेर पांचाली' सारखे चित्रपट ज्यात प्रथमच जगाने भारतीय सिनेमाची झलक पहिली....**



**2 मे 1921 मृत्यू : 23 एप्रिल 1992**

बहु दिन धोरे बहु क्रोशे दूरे,
बहु व्यय कोरे बहु देशे घूरे
देखिते गियेछी पर्वत माला
देखिते गियेछी सिंधु
देखा होय नाई चक्षु मेलिया
घर होते सुधु दुई पा फेलिया
एक टि धानेर शीशेर ऊपरे
एक टि शिशिर बिंदु

बांग्लामध्ये लिहिलेली ही कविता गुरुदेव रवींद्र नाथ टागोर यांनी त्या मुलाच्या वहीत लिहिली होती जो शांति निकेतनमध्ये आपल्या आईसोबत त्यांना भेटायला आला होता. आईने अर्थ समजावून सांगायला सांगितले तेव्हा गुरुदेव म्हणाले - जेव्हा मोठा होईल तेव्हा त्याला समजेल. या कवितेच्या रूपात गुरुदेव यांच्याकडून सूत्र घेणा या या मुलाचे नाव माणिक होते. जेव्हा तो मोठा झाला तेव्हा त्याची जगातील महान दिग्दर्शकांपैकी एक सत्यजीत रे नावाने जगाला ओळख झाली.

2 मे 1921 रोजी कोलकाता इथे जन्मलेले सत्यजीत रे केवळ 3 वर्षांचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. आईने मोठ्या कष्टाने त्यांना वाढवले. त्यांनी सर्वप्रथम प्रेसीडेंसी महाविद्यालय आणि नंतर शांति निकेतन इथे शिक्षण घेतले. त्यानंतर ते ग्राफिक डिजायनर म्हणून काम करायला लागले. जिम कॉर्बेट यांचे 'मॅन ईटर्स ऑफ कुमाऊं' आणि पं. जवाहरलाल नेहरू यांचे 'डिस्कवरी ऑफ इंडिया' चे मुखपृष्ठ सत्यजीत रे यांनीच डिजाइन केले होते. 1950 मध्ये त्यांच्या कंपनीने त्यांना लंडनला पाठवले. लंडनमध्ये व्यतीत त्या दिवसांनी रे यांचे आयुष्यच बदलून टाकले. 6 महिन्यांमध्ये त्यांनी 100 पेक्षा अधिक चित्रपट पाहिले. कोलकात्याला परत आले तेव्हा अतिरंजन आणि नाटकीपणा पासून दूर सार्थक सिनेमाच्या माध्यमातून भारतातील गावामधील एका कुटुंबाचा संघर्ष 'पथेर पांचाली' च्या रूपाने पडद्यावर साकारण्याचा त्यांनी निर्णय घेतला.

1928 मध्ये प्रकाशित विभूतिभूषण बंद्योपाध्याय यांच्या या प्रसिद्ध कादंबरीच्या बाल आवृत्तीचे मुखपृष्ठ देखील रे यांनीच तयार केले होते. नवोदित कलाकार आणि नवीन दिग्दर्शकावर कुणी पैसे लावायला देखील तयार नव्हते. मोठया मुश्किलीने 1955 मध्ये हा चित्रपट पडद्यावर झळकला तेव्हा जागतिक सिनेमाच्या मंचावर सर्वात जास्त प्रशंसा झाली. 11 आंतरराष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाले. ही सुरुवात होती. यानंतर तीन दशकांहून अधिक काळ सत्यजीत रे यांनी सुमारे तीन डझन चित्रपट दिग्दर्शित केले. यात पारस पत्थर, कंचनजंघा, महापुरुष, अपूर संसार,महानगर, चारूलता, अपराजितो, गूपी गायन-बाघा बायन यांचा समावेश आहे. हिंदीत 'शतरंज के खिलाड़ी' चे देखील दिग्दर्शन त्यांनी केले.

1978 मध्ये बर्लिन चित्रपट महोत्सवाच्या संचालक समितीने त्यांना जगातील तीन सार्वकालिक दिग्दर्शकांपैकी एक म्हणून गौरवले. भारत सरकारच्या वतीने चित्रपट निर्मिती क्षेत्रात विविध योगदानासाठी त्यांना 32 राष्ट्रीय पुरस्कार मिळाले. 1985 मध्ये त्यांना दादासाहेब फाळके पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. 1992 मध्ये त्यांना भारतरत्न मिळाले आणि ऑस्कर (ऑनरेरी अवॉर्ड फॉर लाइफटाइम अचीवमेंट) देखील. मात्र रे आजारी होते, त्यामुळे ऑस्कर स्वीकारण्यासाठी जाऊ शकत नव्हते. ऑस्कर पुरस्काराच्या पदाधिका यांनी त्यांच्या घरी जाऊन त्यांना सन्मानित केले. या आयोजनावर लघुपट तयार करण्यात आला आणि तो ऑस्कर समारंभात प्रदर्शित करून संपूर्ण जगाला दाखवण्यात आला. एक महिन्याच्या आतच 23 एप्रिल 1992 रोजी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले.



# सर्वांसाठी फायद्याचा सौदा

पूर्वी आपल्याला 20 वर्षापेक्षा जुनी खाजगी वाहने आणि 15 वर्षापेक्षा जुनी व्यावसायिक वाहने भंगारात 4-6 हजार रुपायात विकावी लागत असत. अशा रीतीने भंगारात गेलेल्या अनेक गाड्या आपण आपल्या आजूबाजूलाही पाहिल्या असतील.मात्र आता या जुन्या गाड्या, त्यांच्या मालकांच्या सहकार्याने, सरकार आणि पर्यावरण अशा दोन्हींसाठी फायदेशीर ठरतील त्याच बरोबर भंगारविषयीच्या धोरणामुळे देशाच्या वाहन उद्योगालाही मिळेल नवा वेग

भारतात 20 वर्षे जुन्या 51 लाख आणि 15 वर्षे जुन्या 34 लाख मोटार गाड्या आहेत. सुमारे 17 लाख मध्यम आणि अवजड वाणिज्यिक वाहने आहेत, जी 15 वर्षापेक्षा जास्त जुनी आहेत आणि त्यांच्याकडे वैध फिटनेस प्रमाणपत्र नाही. रस्त्यावरून धावण्यासाठी फिट वाहनाच्या तुलनेत,जुनी वाहने,पर्यावरण 10 ते 12 पटीने जास्त प्रदूषित करतात आणि रस्ता सुरक्षेसाठीही धोका निर्माण करतात. म्हणूनच केंद्र सरकारने प्रथमच आंतरराष्ट्रीय मापदंडानुसार भंगारविषयक धोरण आणले आहे. जर्मनी, ब्रिटन, अमेरिका आणि जपान यासारख्या वेगवेगळ्या देशातल्या मापदंडाचा तुलनात्मक अभ्यास करून त्यानंतर हे मापदंड तयार करण्यात आले आहेत. खरे तर जन सामान्यांना लाभदायी ठरेल अशा धोरणांबरोबरच



# लाखो लोकांना नव्या रोजगाराची संधी

## वाहने भंगारात काढण्याच्या धोरणाविषयी सर्व माहिती जी आपण जाणून घेऊ इच्छिता

### काय आहे या भंगार विषयक धोरणात

**15 वर्षे जुन्या व्यावसायिक आणि 20 वर्षे जुन्या खाजगी गाड्यांना हे धोरण लागू होईल. या धोरणात 15 वर्षे जुन्या गाड्या रस्त्यावर धावण्यापासून थांबवण्याची तरतूद रद्द करण्यात आली आहे. मात्र अशा गाड्यांना दरवर्षी फिटनेस प्रमाणपत्र घ्यावे लागेल. याबरोबरच नोंदणी नुतनीकरणासाठीचे शुल्क वाढवून दुप्पटवरून तिप्पट करण्यात आले आहे.**

- व्यावसायिक वाहनांना फिटनेस प्रमाणपत्र न मिळाल्यास 15 वर्षांनंतर त्याची नोंदणी समाप्त होईल.
- खाजगी वाहनांसाठी 20 वर्षांनंतर नोंदणीचे नुतनीकरण न झाल्यास किंवा वाहन फिट नसल्यास नोंदणी रद्द करण्यात येईल. 15 वर्षांचा कालावधी पूर्ण करणाऱ्या वाहनांना नोंदणी दुसऱ्यांदा करण्यासाठी वाढीव शुल्क द्यावे लागेल.
- केंद्र सरकार, राज्य सरकार, नगरपालिका, नगर पंचायत, राज्य परिवहन उपक्रम आणि केंद्रआणि राज्य सरकारांच्या स्वायत्त संस्थांच्या सर्व वाहनांची, त्यांच्या नोंदणी तारखेला 15 वर्षे पूर्ण झाल्यानंतर त्यांची नोंदणी रद्द करण्यात येईल.

### वाहने मोडीत काढण्याची प्रक्रिया काय असेल

**सर्वात आधी जाणून घ्या आपल्याला काय फायदा होईल**



1 जुन्या वाहनासाठी,स्क्रॅपिंगकेंद्राकडून दिली गेलेली मोडीसाठीची किंमत,नव्या वाहनाच्या शोरुम किमतीच्या साधारणपणे 4 - 6 % असेल.

2 स्क्रॅपिंगचे प्रमाणपत्र दाखवल्यानंतर वाहन निर्माता आपल्याला 5 टक्यापर्यंत सवलत देईल. असे समजूया की आपण अशी गाडी खरेदी करत आहात ज्याची एक्स शोरुम किंमत 10 लाख रुपये आहे तर आपल्याला त्यावर सुमारे 50 हजार रुपयांची सवलत मिळेल.

3 वाहन निर्मात्यांकडून वेळो-वेळी आपल्याला देण्यात येणाऱ्या सवलती व्यतिरिक्त ही सवलत राहील.

4 स्क्रॅपिंगचे प्रमाणपत्र दाखवल्यानंतर नव्या वाहनाचे नोंदणी शुल्क पूर्णपणे माफ केले जाऊ शकते.रस्ते करातून खाजगी वाहनांना 25 % तर व्यावसायिक वाहनांना 15 % सूट देण्याच्या सूचना राज्यांना देण्यात आल्या आहेत.

### रिसायकल केल्याने खर्चात घट ..

देशात स्क्रॅपिंग केंद्र उभारण्यात येतील. या केंद्रांवर जुन्या वाहनांना रिसायकल करण्यात येईल.ज्या देशांमध्ये स्क्रॅपिंग सुविधा नाहीत अशा देशातली वाहनेही या केंद्रांवर मोडीत काढता येतील असे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी म्हटले आहे. यातून अल्युमिनियम, तांबे आणि रबराच्या पुनर्वापराला प्रोत्साहन मिळेल.रिसायकलिंगमुळे वाहन कंपन्यांना कच्चा माल मिळेल. एका अनुमानानुसार वाहनांचा खर्च 40 % पर्यंत कमी होण्याची आशा आहे.

पर्यावरण आणि त्याच्याशी संबंधित क्षेत्रावरही त्याचा सकारात्मक प्रभावपडेल अशा धोरणाकडे सरकारचे लक्ष आहे. याच दिशेने जुनी वाहने मोडीत काढण्याच्या धोरणाच्या रूपाने हे नवे पाऊल आहे. केंद्रीय वित्त मंत्री निर्मला सीतारामन यांनी 1 फेब्रुवारीला संसदेत अर्थसंकल्प सादर करताना याची घोषणा केली होती. कालबद्ध रीतीने काम करण्याची ही सरकारची कटीबद्धताच आहे की 46 दिवसातच 18 मार्चला केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री याचा संपूर्ण फायदा आपल्याला असा जाणून घेता येईल असे समजूया की आपण एक गाडी मोडीत काढण्यासाठी दिली. बाजारात अशा नव्या वाहनाची किंमत सुमारे 10 लाख रुपये आहे. तर स्क्रॅपिंग केंद्राकडून जुन्या गाडीचे आपल्याला साधारणतः 60 हजार रुपये मिळतील. आता आपण दहा लाख रुपये किमतीची एक्स –शोरूम किंमत असलेली नवी पेट्रोल गाडी स्वतःच्या वापरासाठी खरेदी

# याचा संपूर्ण फायदा आपल्याला असा जाणून घेता येईल

असे समजूया की आपण एक गाडी मोडीत काढण्यासाठी दिली. बाजारात अशा नव्या वाहनाची किंमत सुमारे 10 लाख रुपये आहे. तर स्क्रॅपिंग केंद्राकडून जुन्या गाडीचे आपल्याला साधारणतः 60 हजार रुपये मिळतील. आता आपण दहा लाख रुपये किमतीची एक्स – शोरूम किंमत असलेली नवी पेट्रोल गाडी स्वतःच्या वापरासाठी खरेदी करत आहात तर वाहन भंगारात काढण्याच्या धोरणानुसार आपला असा फायदा होईल–

एक्स-शोरूम किंमत
₹10,00000

₹50,000
स्क्रॅपिंग प्रमाणपत्रावर निर्मात्याकडून सूट

₹600
नोंदणीशुल्क सवलत



रस्ते करातून सूट... पेट्रोल वाहनांवर दिल्लीमध्ये 7% रस्ते कर द्यावा लागतो म्हणजे सुमारे 70000 आणि 25% च्या हिशोबाने सूट – 17500

**म्हणजे आपला एकूण फायदा**
60,000+50,000+600+17,500 = 1,28,100*

*(सर्वाधिक सूट त्यासह दिलेली आकडेवारी अंदाजित आहे. धोरणाचा अंतिम मसुदा तयार झाल्यावर त्यात बदल संभवतो.)

## भारत ठरेल ऑटोमोबाइल हब

**50%** भारतात वाहने तयार करणाऱ्या कंपन्या सध्या दुसऱ्या देशात निर्यात करतात

वाहने मोडीत काढण्याच्या धोरणानुसार रिसायकलिंगला प्रोत्साहन मिळाल्याने खर्च कमी होऊन जगभरात स्पर्धात्मक ठरतील.

वाहनांचा फिटनेस आणि प्रदूषण स्तर मापनासाठी प्रत्येक जिल्ह्यात केंद्र उभारण्यात येतील. यातून येत्या पाच वर्षात देश ऑटोमोबाइल हब बनू शकतो.



**10,000**
कोटी रुपयांची गुंतवणूक येईल या व्यवस्थेतून

## रोजगार संधीही ...

**35,000**
नवे रोजगार थेट निर्माण होतील. अप्रत्यक्ष रित्या लाखो नवे रोजगार निर्माण होतील.

## ई वाहनांनाही प्रोत्साहन

वाहने मोडीत काढण्याच्या धोरणासह सरकार इलेक्ट्रिक वाहनांनाही आणखी प्रोत्साहन देईल. अशा वाहनात वापरली जाणारी 81% लीथियम बॅटरी देशात निर्माण होत आहे. पुढच्या वर्षापर्यंत 100% बॅटरी मेडइन इंडिया असेल.

## प्रदुषणाला बसेल आळा, इंधनाचीही होईल बचत ...

- या धोरणाअंतर्गत येऊ शकतील अशी सुमारे 1 कोटी वाहने रस्त्यावरून धावत आहेत.2025 पर्यंत यांची संख्या सुमारे 2.8 कोटी होईल. सुयोग्य वाहनांच्या तुलनेत ही वाहने 10-12 पटीने जास्त प्रदूषणकारक असतात.
- अशी जुनी वाहने रस्त्यावरून न धावल्याने कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जनात 17 % घट होईल. वाहनातून निघणा या विषारी कणांचे प्रमाण 24 % कमी होईल.
- बीएस-2 आणि बीएस-3 ची वाहने व्यवहारातून बाहेर झाल्याने 80 लाख टन इंधनाची बचत होईल.

नितिन गडकरी यांनी याचा मसुदाही जारी केला. या मसुद्यावर आलेल्या सूचनांवर विचारविमर्श केल्यानंतर 1 ऑक्टोबरपासून हे लागू केले जाईल. येत्या पाच वर्षात याद्वारे मोठ्या संख्येने रोजगार निर्मिती होईल आणि आपल्या वाहन क्षेत्राला नवी बळकटी मिळेल पर्यावरण रक्षणासह आर्थिक दृष्ट्याही हा फायद्याचा सौदा आहे. सूचना आणि राज्य सरकारांच्या मतानंतर हे लागू करण्यात येईल.



# जल सुशासन

## जल संवर्धनाचा भगीरथ संकल्प

**केंद्र सरकारने, आपली धोरणे आणि निर्णयात 'जल सुशासन' प्राधान्यावर ठेवत प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, प्रत्येक शेताला पाणी, 'पर ड्रॉप मोअर क्रॉप' अभियान, नमामि गंगे मिशन, जल जीवनमिशन आणि अटल भूजल योजना यासारख्या उपक्रमातून जनतेलाही यामध्ये सहभागी करून घेण्यात आले आहे. जल संवर्धनाच्या दिशेने लोक सहभागासह 'कॅच द रेनः कुठेही, कधीही, शक्य असेल तेव्हा पावसाच्या पाण्याचा संचय करा' या अनोख्या अभियानाची आणि नद्या जोड प्रकल्पाची ऐतिहासिक सुरवात**

*जल आपल्यासाठी जीवन आहे, आस्था आहे आणि विकासाची धारा देखील आहे. पाणी एकप्रकारे पारस पेक्षाही महत्त्वपूर्ण आहे. पारस धातूच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते, असे म्हटले जाते. त्याच प्रमाणे पाण्याचा स्पर्श जीवनासाठी आवश्यक आहे, विकासासाठी गरजेचा आहे.*

— नरेंद्र मोदी, पंतप्रधान



दर वर्षी देशाच्या सुमारे एक तृतीयांश भागात दुष्काळ तर सरासरी 4 कोटी हेक्टर क्षेत्राला पुराचा फटका बसतो. हा असमतोल संपुष्टात आणला तर देशाच्या जलसंपदेच्या विनाशाची नव्हे तर फक्त आणि फक्त विकासाची गाथा लिहिली जाऊ शकते. सद्य स्थितीमध्ये बदल घडवण्यासाठी आणि भविष्यातल्या संकटांना तोंड देण्यासाठी केंद्र सरकारने जागतिक जल दिनी 22 मार्चला नद्या जोड योजना आणि जल संचयाच्या दिशेने क्रांतिकारक सुरवात केली आहे. यासाठी 'कॅच द रेनः कुठेही, कधीही, शक्य असेल तेव्हा पावसाच्या पाण्याचा संचय करा'या अभियानासह केन- बेतवा जोड ही बहु प्रतीक्षित योजना साकारत आहे.

# केन-बेतवा जोड
# बुंदेलखंड साठी नवी पहाट




**प्रकल्पातली राज्ये**
उत्तर प्रदेश। मध्य प्रदेश

**बुंदेलखंडच्या या भागांना होणार लाभ**

- मध्य प्रदेश
- छतरपुर • पन्ना
- टीकमगढ़

- उत्तर प्रदेश
- ललितपुर • झांसी
- बांदा • महोबा

केन-बेतवा जोड योजना ही नद्यांना एकमेकांशी जोडणारी राष्ट्रीय स्तरावरची अशा प्रकारची पहिली योजना आहे. भारताचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांनी पाहिलेले हे स्वप्न साकार करण्याचा प्रण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. बहु प्रतीक्षित केन-बेतवा जोड प्रकल्पाने, नदी जोड प्रकल्पाचा प्रारंभ झाला आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, ‘अटल जी यांचे एक स्वप्न होते,नद्या ग्रीडचे,नद्या जोडण्याचे.केन-बेतवा जोडण्याचा आम्ही निश्चय केला आहे. केन- बेतवा जोडण्यात आल्या आणि पाणी जमिनीत झिरपू लागले कीसंपूर्ण बुंदेलखंडात खालावलेली पाण्याची पातळी वाढायला आणि पाणी वरती यायला सुरवात होईल. प्रत्येक भागातल्या शेतकऱ्याला त्याचा लाभ होऊ लागेल.’ पाण्यासाठी तहानलेल्या बुंदेलखंडाच्या नागरिकांची तहान भागवण्याचा संवेदनशील दृष्टीकोन नद्या जोडण्याच्या पंतप्रधानांच्या या प्रतिज्ञेमागे आहे.

**221 किमी लांबीच्या जोड कालव्यातून केन नदीचे पाणी बेतवा नदी पर्यंत पोहोचेल**

*या अंतर्गत केन नदीच्या 2800 दशलक्ष क्यूबिक मीटर पेक्षा जास्त पुराच्या पाण्याचा धरणात साठा केला जाईल. केनचे अतिरिक्त पाणी बेतवा नदीत पाठवण्यासाठी 221 किमी लांबीचा कालवा तयार करण्यात येईल. या भागातली तळी, जलाशय यांची या जोड योजनेशी सांगड घातली जाईल.*

## सिंचनासाठी पुरेसे पाणी मिळेल

या योजनेचा लाभ मध्य प्रदेशच्या पन्ना, टीकमगढ़, छतरपुर, सागर, दमोह, दतिया, विदिशा, शिवपुरी आणि रायसेन या 9 जिल्ह्यांना त्याचबरोबर उत्तर प्रदेशच्या बांदा, महोबा, झाशी आणि ललितपुर या चार जिल्ह्यांना थेट मिळणार आहे. बुंदेलखंडचे चित्र पालटणारी केन-बेतवा जोड योजना पूर्ण झाल्यानंतर दोन्ही राज्यांच्या 13 जिल्ह्यातील सुमारे 10.62 लाख हेक्टर शेत जमिनीला सिंचनासाठी पाणी उपलब्ध होईल.

**8.11**
**लाख हेक्टर जमिनीचे सिंचन मध्यप्रदेशात**

**2.51**
**लाख हेक्टर जमिनीचे सिंचन उत्तर प्रदेशात**

**62 लाख लोकांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळेल**

**130 मेगावॉट विजेची निर्मितीही होईल.**

## जन कनेक्टिविटीतून जल कनेक्टिविटी

‘कॅचद रेन’ अभियानाला देशभरात 22 मार्च ते 30 नोव्हेंबर या काळासाठी भारताच्या सर्व जिल्ह्यातल्या शहरी आणि ग्रामीण भागात सुरवात करण्यात आली आहे ज्यायोगे लोक सहभागातून या जल चळवळीला जन चळवळीचे स्वरूप येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अभियानाचा प्रारंभ केला आणि याच वेळी केन-बेतवा जोड योजनेच्या ऐतिहासिक सामंजस्य करारावर स्वाक्ष याही झाल्या. या कार्यक्रमा नंतर पाणी आणि जल संवर्धनाशी संबंधित विविध विषयांवर विचार विमर्शकरण्यासाठसर्व ग्राम पंचायतीमध्ये ग्राम सभांचे आयोजन करून जल संरक्षणासाठी ‘जल शपथ’ ची सुरवात करण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात, ‘हे प्रयत्न करतानाच हा हा चिंतेचा विषय आहे की आपल्या देशात पावसाचे बरचसे पाणी वाया जाते.पावसाच्या पाण्याचे भारत जितके उत्तम व्यवस्थापन करेल तितकेच भू जलावरचे अवलंबित्व कमी होईल.म्हणूनच ‘कॅच द रेन’ सारखी अभियाने सुरु करून ती यशस्वी होणे आवश्यक आहे.

# ‘कॅच द रेन’ अभियानाची सुरवात करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संबोधनातले ठळक मुद्दे

*“पाण्याबाबत आपला दृष्टीकोन बदलेल तेव्हा निसर्गही आपल्याला मदत करेल. आपण खूप वेळा ऐकले आहे की सैन्याला सांगितले जाते की शांतता काळात सैन्य जितका जास्त घाम गाळेल, युद्धाच्या वेळी तितकाच कमी रक्तपात होतो. मला वाटते हा नियम पाण्यालाही लागू होतो. पावसाच्या आधीच आपण पाण्यासाठी मेहनत केली, योजना तयार केल्या आणि पाण्याची बचत करण्याचे काम केले तर दुष्काळाच्या काळात जे कोट्यवधी रुपयांचे नुकसान होते आणि बाकीची कामे ठप्प होतात, लोकांना समस्यांना तोंड द्यावे लागते, पशुधनाला स्थलांतर करावे लागते हे सर्व टाळता येईल.म्हणूनच शांतता काळात घाम गाळणे हा युद्धाच्या काळात कमी रक्तपात होण्यासाठीचा मंत्र आहे त्याप्रमाणेच पाण्यासाठी, पावसाच्या पूर्वी जितकी जास्त मेहनत कराल तितकेच उपयुक्त ठरेल.’ ”*

- आपल्या पूर्वजांनी आपल्यासाठी पाण्याची व्यवस्था केली, आपल्या भावी पिढीसाठी पाणी उपलब्ध करून देण्याची आता आपली जबाबदारी आहे. पाण्याची बचत करण्यासाठी आपल्याला प्रतिज्ञा करावी लागेल
- मला तर वाटते, पाऊस येईपर्यंत मनरेगाचा एक-एक पैसा फक्त आणि फक्त याच कामासाठी उपयोगात आणला पाहिजे. पाण्यासंदर्भात जी काही तयारी करायची आहे, मनरेगाचा पैसा आता इतरत्र वळवता कामा नये.
- भारताचा विकास आणि आत्मनिर्भरता आपल्या जल स्त्रोतांवर अवलंबून आहे.
- स्वातंत्र्यानंतर प्रथमच एखादे सरकार पाण्यासंदर्भात इतक्या गांभीर्याने काम करत आहे. प्रत्येक गावात कमीत कमी पाच प्रशिक्षित महिला पाण्याबाबत तपासणी करत आहेत. जलसुशासनात भगिनी आणि कन्या यांच्या भूमिकेला जितके प्रोत्साहन दिले जाईल तितकेच उत्तम परिणाम मिळणार हे निश्चित. “चला, सर्वांनी एकत्र येऊन जल संचयाची ही मोहीम यशस्वी करू या.”




जल कनेक्टिविटीच्या उपक्रमात उत्तम व्यवस्थापन आणि उत्तम परिणाम साधता यावा यासाठी तंत्रज्ञानाच्या जास्तीत जास्त वापरावर केंद्र सरकारकडून भर देण्यात येत आहे.

**समग्र दृष्टीकोनातून पाण्याच्या संदर्भात तयार करण्यात येत आहे धोरण**

संयुक्त राष्ट्रांच्या एका अहवालानुसार जगातल्या पाण्यापैकी 4 % पाणी भारतात आहे आणि जगातली 18 टक्के लोकसंख्या इथे राहते. केंद्रीय भू जल मंडळानुसार भारतात भूगर्भातल्या पाण्याची पातळी झपाट्याने खालावत आहे. जगभरातल्या एकूण भूमिगत पाण्याच्या 24 % पाणी आपल्या देशात वापरले जात आहे. आपण वापरत असलेले 40% पाणी आपल्याला भू जल माध्यमातूनच मिळत असते. वापरात येण्याजोग्या जल संसाधनामध्ये भू जलाचे प्रमाण 432 अब्ज क्युबिक मीटर आहे. नीती आयोगाच्या 2018 च्या अहवालानुसार 2030 पर्यंत भारतात पाण्याची मागणी उपलब्ध जल वितरणाच्या दुप्पट होईल.पाणी हा अनमोल ठेवा आहे आणि जल संवर्धनाचे महत्व लक्षात घेऊन 2019 मध्ये पाण्याची समस्या भेडसावणा या 256 जिल्ह्यात जलशक्ती अभियानाचा प्रारंभ करण्यात आला. प्रत्येक घरात पाणी आणि अटल भूजल यासारख्या योजना कार्यान्वित करण्यात आल्या ज्यातून ग्रामीण भागात कोट्यवधी लोकांच्या घरात पाणी पोहोचले आणि भूजल स्त्रोतांचे उत्तम व्यवस्थापन होऊ लागले. या वेळी जलशक्ती अभियानाचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही भागांना सहभागी करून घेतले जात आहे. पावसाळा यायला अजून काही काळ बाकी आहे म्हणूनच पावसाळ्यापुर्वी तलाव,विहिरी यांची साफ-सफाई, त्यातून गाळ काढायचे काम असल्यासअशी कामे करून घ्यावी, पावसाचे पाणी वाहून इथे येताना वाटेत काही अडथळा असेल तर तो दूर करायला हवा असे पंतप्रधान सांगतात. अशा प्रकारची कामे सर्व शक्तीनिशी करायची आहेत ज्यामुळे पाण्याची साठवण करण्याची क्षमता वाढेल.






# महिलांसाठी प्रेरणादायी वेलू, युवकांसाठी चैतन्यदायी खुदिराम बोस

**स्वातंत्र्याची 75 वर्षे साजरी करणारे राष्ट्र आपल्या विकास गाथेत महत्वाचे असे अनेक टप्पे गाठत आहे, जिथून पुढच्या 25 वर्षांचा 'शताब्दी संकल्प' होईल. युवावर्गाच्या आकांक्षा आणि 100 व्या वर्धापन दिनी नव भारताचे स्वप्न कसे साकार होईल यासाठी आवश्यकता आहे ती स्वातंत्र्य लढ्यातल्या या शूर वीरांच्या जीवन गाथेतून प्रेरणा घेण्याची आणि राष्ट्र निर्माणाचा नवा मार्ग घडवण्याची. 'न्यू इंडिया समाचार' सादर करत आहे प्रमुख सेनानी आणि अनाम राहिलेल्या नायकांची संघर्ष गाथा**

आपण जेव्हा गुलामीच्या त्या कालखंडाची कल्पना करतो जिथे कोट्यवधी लोकांनी शतकांपासून स्वातंत्र्याच्या पहाटेची प्रतीक्षा केली, अशा वेळी स्वातंत्र्याची 75 वर्षे ही घटना किती ऐतिहासिक आणि गौरवशाली आहे याची जाणीव तीव्रतेने होते. या पर्वात शाश्वत भारताची परंपरा,स्वातंत्र्य लढ्याचे प्रतिबिंब आणि स्वतंत्र भारताला अभिमानास्पद प्रगतीही आहे. मात्र देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातली अशी अनेक आंदोलने आणि संघर्ष आहेत जे देशासमोर ज्या स्वरुपात यायला हवे होते त्या रुपात आले नाहीत.प्रत्येक लढा हा असत्याविरोधात सत्याचा दृढ उद्घोष आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले," हा लढा म्हणजे अन्याय, शोषण आणि हिंसे विरोधात भारतात जे स्फुलिंग राम युगात, महाभारताच्या कुरु क्षेत्रात, हळदी घाटातल्या रणभूमीत होते तेच स्फुलिंग, तेच शौर्य भारताच्या प्रत्येक भागात,प्रत्येक वर्गाने आणि प्रत्येक समाजाने स्वातंत्र्याच्या लढ्यात आपल्यामध्ये चेतवले होते याची साक्ष आहे. "स्वातंत्र्याच्या इतिहासात कोल आंदोलन, खासी आंदोलन, संथाल क्रांती , कछोहा कछार, नागा संघर्ष ,कूका आंदोलन, भिल्ल आंदोलन असो किंवा मुंडा क्रांती, संन्यासी आंदोलन,रामोशी संघर्ष, कित्तूर, त्रावणकोर आंदोलन, बारडोली, चंपारण सत्याग्रह, संभलपुर, चुआर, बुंदेल संघर्ष असे अनेक संघर्ष आणि आंदोलनांनी देशाच्या प्रत्येक भागात प्रत्येक कालखंडात स्वातंत्र्याची ज्योत धगधगती ठेवली. शीख गुरु परंपरेने देशाची संस्कृती,रिती-रिवाज यांच्या रक्षणासाठी नवी ऊर्जा, नवी प्रेरणा दिली,त्याग आणि बलिदानाचा मार्ग दाखवला. म्हणूनच या आंदोलनांचे वारंवार स्मरण केले पाहिजे.



# इंग्रजांना सळो की पळो करणारी राणी

तामिळनाडूची वेलू नचियार ही पहिली महाराणी होती ज्यांनी इंग्रज राजवटी विरोधात लढा दिला.रामनाथपुरम मध्ये राहणारी वेलू,विवाहानंतर शिवगंगा राज्याची राणी झाली.शिवगंगा ताब्यात घेण्यासाठी इंग्रजांनी 1772 मध्ये राज्यावर हल्ला केला आणि वेलू यांच्या पतीने इंग्रजांशी वाटाघाटी करण्यासाठी दूत पाठवले. मात्र ब्रिटिशांनी हल्ला करून वेलू यांच्या पतीला ठार केले. त्यानंतर याचा बदला घेण्याचा निश्चय वेलू यांनी केला.मारुड ब्रदर्स, अनेक मातब्बर सरदार आणि अंगरक्षक नेता उदयाल यांचा पाठिंबा होता.शूर वेलू ने महिलांची एक तुकडी उभारून त्याला उदयाल तुकडी म्हणून नाव दिले. तिच्या विश्वासु कुईलीने याचे नेतृत्व केले, तिने महिला छापामारांकडे एक कामगिरी सोपवली.इंग्रजांनी त्यांनापकडले तेव्हा त्यांनी शस्त्रास्त्र भांडारात घुसून आग लावली.यात त्यांचा मृत्यू झाला. मानवी बॉम्बचा पहिला उपयोग त्यांनी केला असे म्हटले जाते.वेलू नचियार यांनी इंग्रजांच्या तावडीतून शिवगंगा राज्य मुक्त केले आणि महाराणी म्हणून दहा वर्षे कारभार केला.1947 मध्ये संस्थाने विलीन होईपर्यंत शिवगंगा इथे त्यांच्या कुटुंबियांचेच राज्य राहिले.भारत सरकारने 2008 मध्ये त्यांच्या सन्मानार्थ टपाल तिकीट जारी केले.

# शहीद होऊन स्वातंत्र्याचे स्फुलिंग चेतवणारे सर्वात युवा क्रांतिकारी




खुदिराम बोस हे भारताच्या सर्वात युवा क्रांतीकारकांपैकी एक होते. खुदिराम बोस भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातले एक असे नायक होते ज्यांना 18 व्या वर्षी इंग्रजांनी 11 ऑगस्ट 1908 मध्ये बिहारच्या मुझफ्फरपूर तुरुंगात फाशी दिली. खुदिराम बोस यांचा जन्म अखंड बंगालमध्ये 3 सप्टेंबर 1889 ला मिदनापूर जिल्ह्यातल्या एका छोट्या गावात झाला. लहानपणीच आई-वडिलांचे छत्र हरपलेल्या खुदिराम यांचा सांभाळ त्यांच्या मोठ्या बहिणीने केला. 1905 मध्ये बंग-भंग म्हणजे बंगाल विभाजनानंतर त्यांनी देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली आणि सत्येन बोस यांच्या नेतृत्वाखाली आपले क्रांतिकारकाचे जीवन सुरु केले. क्रूर इंग्रज अधिकारी किंग्सफोर्डच्या हत्येची कामगिरी त्यांच्या कडे सोपवण्यात आली.या कामगिरीसाठीच ते बिहारच्या मुझफ्फरपूर इथे पोहोचले होते. एक दिवस संधी पाहून त्यांनी किंग्सफोर्डच्या बग्गीवर बॉम्ब फेकला मात्र त्यात किंग्सफोर्ड नव्हता तर दुसऱ्या इंग्रज अधिकाऱ्याची पत्नी आणि मुलगी होती. या हल्यात त्या दोघींचा मृत्यू झाला. मात्र या घटनेनंतर पोलीस त्यांच्या मागे लागले, अखेर ते पकडले गेले आणि त्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली.



## नेशनल टेस्टिंग एजेंसी

# योग्यतेची परीक्षा



मे 2018 साली राष्ट्रीय चाचणी यंत्रणा (एनटीए) च्या रूपाने एक अशी आंतरराष्ट्रीय संस्था अस्तित्वात आली आहे, जिने अत्यंत कमी वेळात, योग्यत आणि क्षमतेच्या मूल्यांकनाची पद्धत आणि दिशाही बदलली आहे. जेणेकरुन, परीक्षेची पातळी मुलांच्या बौद्धिक स्तराशी जोडली जाऊन, त्याला जागतिक स्पर्धेसाठी अनुकूल अशा ज्ञानाने सज्ज केले जाऊ शकेल. सोप्या शब्दांत सांगायचे झाल्यास, पहिल्यांदाच, आपल्या शिक्षण व्यवस्थेला गुणांच्या टक्केवारीच्या ऐवजी, योग्यतेवर आधारलेली बनवून शास्त्रीय विचारांच्या आधारे एक भक्कम आराखडा तयार करण्याच्या प्रक्रियेची सुरुवात, राष्ट्रीय चाचणी यंत्रणेपासूनच झाली आहे

प्रमोद कुमार पासवान यांनी गेल्या वर्षी राष्ट्रीय पात्रता चाचणी (NET-नेट) उत्तीर्ण केली आहे. चार वर्षांपूर्वी देखील त्यांनी नेटची परीक्षा दिली होती, त्यावेळी सीबीएसई ही परीक्षा घेत असे.भारतात प्रवेश परीक्षेची पूर्ण पद्धत बदलण्याचे श्रेय एनटीएला देत प्रमोद म्हणतात, “आधी या परीक्षेत जे प्रश्न विचारले जात, ते सगळे पुस्तकातले असत आणि त्यांचा अभ्यास केल्याचे आठवत असे. मात्र आता, नव्या पद्धतीत, आजच्या काळाशी निगडीत प्रश्न असतात. ते पुस्तकी नाही, तर वर्तमानातल्या व्यावहारिक ज्ञानावर आधारलेले असतात. प्रमोद यांच्याप्रमाणेच नेट परीक्षा देणारे मुद्रिका प्रसाद मंडल सांगतात, “ऑफलाईन स्वरूपातल्या परीक्षेसाठी संपूर्ण दिवस खर्च होत असे. मात्र आता ऑनलाईन परीक्षेचा पेपर केवळ तीन तासांत पूर्ण होतो. ओएमआर शीटवर ऑनलाईन स्वरुपात दिलेलं उत्तर गोल खुणेने चिन्हित करण्याची पद्धत आता सोपी झाली आहे, कारण पेपर झाल्यावर तो सबमिट करतांना त्यात बदल करण्याचा पर्याय मिळाला आहे, जो ऑफलाईन मध्ये नव्हता.” स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे की एनटीएच्या परीक्षा पॅटर्नमुळे होणारी कागदाची बचत पर्यावरण संरक्षणासाठी देखील फायदेशीर आहे आणि पुस्तकी प्रश्नांच्या ऐवजी व्यावहारिक विषयांवरचे प्रश्न या परीक्षेचे महत्व वाढवतात कारण ज्ञानाची खरी कसोटी अशा प्रश्नांमुळेच सिद्ध होते.”

आपण कदाचित हे नेहमी पाहिले-ऐकले असेल की एखादा मुलगा डॉक्टर बनू इच्छित होता, मात्र त्याचे आई-वडील आणि इतर परिस्थितीमुळे त्याला इच्छा नसतांनाही इंजिनियरिंगकडे जावे लागले. परिणामी, स्पर्धा परीक्षेच्या गुणवत्ता यादीत, त्या मुलाचा क्रमांक असा नसतो, ज्यामुळे, त्याला आपल्या आवडीच्या शिक्षणसंस्थेत, आपल्या इच्छेनुसार प्रवेश मिळू शकेल. अशा स्थितीत मग तो विद्यार्थी एकतर पुन्हा तयारी करतो किंवा मग दुस या कुठल्या तरी विषयांकडे वळत आयुष्याचे ध्येयच बदलतो. मात्र, क्षमतेची खरी ओळख आणि विद्यार्थ्यांच्या आत असलेली योग्यता आणि गुणवत्ता बाहेर काढून, त्याचा भरपूर लाभ करुन घेण्यासाठीचा उपक्रम, जसा विकसित देशांमध्ये राबवला जातो, तशा प्रकारचे प्रयत्न स्वतंत्र भारतातयाआधी कधीच झाले नाही. या विषयाचा व्यापक अभ्यास आणि तज्ज्ञांसोबत सल्लामसलत करून नोव्हेंबर 2017 साली केंद्रीय मंत्रिमंडळाने या राष्ट्रीय चाचणी यंत्रणेची स्थापना करण्यास मंजुरी दिली. ही यंत्रणा स्वतःचे स्त्रोत निर्माण करुन विद्यार्थ्यांची बौद्धिक क्षमता बाहेर काढत, तिचा योग्य वापर होऊ शकेल अशा स्थानी तिला जागा निर्माण करून देण्याचा प्रयत्न करते. या संदर्भात राष्ट्रीय चाचणी यंत्रणा सातत्याने काम करत आहे. मे 2018 साली ही यंत्रणा अस्तित्वात आली आणि केवळ तीन वर्षातच शास्त्रीय दृष्टीकोनातून आपल्या विद्यार्थ्यांच्या ख या क्षमतांचे आकलन करण्यात ही संस्था एक वरदान सिध्द होत आहे. एनटीए केवळ परीक्षेच्या माध्यमातूनच विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करत नाही, तर परीक्षेच्या काळात, प्रश्न सोडवण्याची विद्यार्थ्यांची पद्धत, त्यासाठी घेतला जाणारा वेळ आणि आकलनशक्ती याचा अभ्यास करुन संबंधित बोर्ड आणि तज्ज्ञांनाही आवश्यक त्या बदलांविषयी सल्ला देत आहे. यातून परीक्षेसोबतच,भारतातल्या शिक्षणव्यवस्थेचे निकषही आंतरराष्ट्रीय दर्जाचे करण्याचे उद्दिष्ट साध्य केले जात आहे.

खरे तर, भारतातल्या उच्च शिक्षण संस्थांच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठीची प्रवेश परीक्षा एका ठराविक साचेबद्ध पद्धतीनुसारच घेतली जात असे. या प्रवेश परीक्षांच्या आयोजनामागे वैज्ञानिक दृष्टिकोन आणि व्यवहारिक ज्ञानाची पारख करण्याच्या विचारांची मोठीच कमतरता होती.

*“जे लोक वर्षभाराचा विचार करतात, ते शेतात बियाणं पेरतात. जे दहा वर्षांचा विचार करतात, ते फळे देणारी झाडे लावतात आणि जे लोक पिढ्यांचा विचार करतात, ते माणसं पेरतात- म्हणजेच शिक्षण, संस्कार आणि जीवनाचा विचार करत त्यासाठी माणसांची मशागत करतात. आपल्या शिक्षण व्यवस्थेलाही असेच आयुष्यनिर्मितीचे ध्येय घेऊन जिवंत करायचे आहे.”*

नरेंद्र मोदी, पंतप्रधान.

**60** लाख परीक्षार्थी दरवर्षी विविध परीक्षांना बसतात.



# एनटीए मुळे इतर संस्थावरचा भार कमी; आता युजीसी, सीबीएसई आणि एआयसीटीई केवळ शैक्षणिक कार्यक्रमांवर लक्ष करु शकतात केंद्रित



आताउच्च शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या प्रवेश परीक्षांचा पॅटर्न अंतरराष्ट्रीय निकषांना अनुसरून करण्याकडे लक्ष दिले जात आहे. लॉर्ड मेकॉलेची शिक्षणपद्धती भारतीयांना केवळ कारकून बनवण्याइतकी मर्यादित होती त्यावेळी मेकॉलेचा विचार होता, या भारतीयांना थोडेफार इंग्रजी शिकवून त्यांना इंग्रजी राजवटीतल्या अधिकाऱ्यांशी बोलण्याइतपत तयार करावे. तेव्हापासून ते आता अगदी अलीकडच्या काही वर्षांपर्यंत कोणत्याही सरकारने या शिक्षणपद्धतीत बदल करुन तिला आंतरराष्ट्रीय दर्जाची व्यवस्था बनवण्यासाठी पुढाकार घेतला नाही. मात्र, आता उच्च शिक्षण व्यवस्थेला आंतरराष्ट्रीय दर्जाची बनवण्यासाठीच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीमुळेच भारतात पहिल्यांदाच कौशल्यासोबतच योग्यतेची खरी ओळख पटवण्यासाठी राष्ट्रीय चाचणी यंत्रणेसारख्या संस्थांची स्थापना करण्यात आली. याच दृष्टीकोनाच्या आधारे 34 वर्षांनंतर आता राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आखण्यात आले आहे.खरे तर, प्रवेश परीक्षेची पूर्ण पद्धती बदलून त्या जागी नवी पद्धत आणण्याइतके हे सोपे नाही. एनटीएच्या या निर्णयामागे इतरही काही करणे होती.



## अतिरिक्त जबाबदारी

स्वातंत्र्यानंतर भारताची शिक्षण व्यवस्था अधिक उत्तम करण्यासारखी काम सुरु झाले, त्यावेळी अशा नियामक संस्था किंवा यंत्रणांची स्थापना केली गेली ज्यांना त्यांच्या एका विशेष परिघात राहून काम करायचे होते. जसे की, उच्च शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी 1956 साली विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी), शालेय शिक्षणासाठी 1962 साली केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ इत्यादी. या सर्व संस्थांचे कार्यक्षेत्र निश्चित होते. मात्र त्याशिवायही त्यांच्यावर इतर अनेक कामांची जबाबदारी टाकण्यात आली होती. जसे की सहाय्यक प्राध्यापकांसाठीची पात्रता परीक्षेची जबाबदारी आधी युजीसी आणि नंतर सीबीएससी कडे आली. अशा सर्व वेगवेगळ्या पात्रता परीक्षांची जबाबदारी वेगळ्या संस्थेकडे असायला हवी होती. या अतिरिक्त कामांमुळे या संस्थांच्या मूळ कामांवरही परिणाम होत होता.






**परीक्षेपासून ते मूल्यांकनापर्यंतचा मोठा कालावधी**

सर्वच परीक्षा ऑफलाईन पद्धतीने होत असत. परीक्षेनंतर उत्तरपत्रिका गोळा केलता जात. मग त्या उत्तरपत्रिका परीक्षा घेणाऱ्या यंत्रणांपर्यंत पोहोचवण्यात वेळ जात असे. त्यानंतर त्याचे मूल्यमापन होत असे.या सगळ्या प्रक्रीयेनंतर निकाल जाहीर करण्यासाठी कधी कधी एका महिन्यापेक्षा अधिक कालावधी लागत असे. त्यामुळे सगळ्या परीक्षा वर्षातून केवळ एकदाच होऊ शकत असत.

## मोठ्या संसाधनांची आवश्यकता


परीक्षा ऑफलाईन पद्धतीने होत असल्याकारणाने, त्याची तयारी, प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते परीक्षा घेणे आणि पुन्हा त्याचे मूल्यमापन करुन निकाल जाहीर करण्यासाठी अनेक संसाधनांची आवश्यकता असे. प्रवेश परीक्षेची अतिरिक्त जबाबदारी पार पडण्यासाठी सीबीएसई आणि एआयसीटीसी सारख्या संस्थांना आपली संपूर्ण संसाधने, मनुष्यबळ खर्च करावे लागत असे. त्यामुळे, त्यांच्या इतर कामांवर परिणाम होत असे.



**रँकिंगला (क्रमवारीला) महत्त्व** हीआपल्या शिक्षणपद्धतीतली सर्वात मोठी उणीव आहे. देशाच्या सर्वच क्षेत्रातल्या विद्यार्थ्यांना एकसारखीच प्रश्नपत्रिका मिळत असे. त्याच्या मूल्यमापनानंतर मग रँकिंग म्हणजे क्रमवारी जाहिर होई आणि नंतर त्यानुसार प्रवेश होत असे. मात्र विद्यार्थी या प्रश्नपत्रिकेविषयी काय विचार करतात,त्यांच्यासाठी ती कशी आहे? याची कुठलीही आकडेवारी किंवा फीडबॅक मिळत नसे. म्हणजे कल्पना करा, की वेगवेगळ्या बोर्ड आणि प्रदेशातील दोन विद्यार्थ्यांनी आयआयटी संयुक्त प्रवेश परीक्षेची प्रश्नपत्रिका सोडवली. दोघांपैकी कोणत्या विद्यार्थ्याला कोणता प्रश्न सोपा वाटला? त्याने कोणता प्रश्न सोडवण्यासाठी किती वेळ घेतला? असे कुठलेही अध्ययन याआधी केले जात नसे.आंतरराष्ट्रीय निकषांच्या आधारावर, या परीक्षांचे वेगळेपण उठून दिसेल, अशी एकरूपता या परिक्षांमध्ये नव्हती.

**मानवी चुकांमुळे एखादी त्रुटी होण्याची शक्यता**

ही सगळी परीक्षा प्रक्रिया गुंतागुंतीची आणि व्यापक असल्याने त्यात मानवी चुका किंवा कोणत्याही पातळीवर काही त्रुटी राहू शकणे स्वाभाविक होते. जसे की उत्तरपत्रिकेवर चुकीचा आसनक्रमांक टाकला जाणे. ओएमआय शीट मध्ये चुकीच्या जागी किंवा योग्य पद्धतीने उत्तर चिन्हित केले नसेल, तर योग्य मूल्यांकन होऊ न शकणे. त्यासोबतच, ओएमआर शीटमध्ये परीक्षेनंतर देखील जाणूनबुजून काही गडबड-गोंधळ होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही.



याच सर्व कारणांमुळे, 1986 च्या शिक्षण धोरणात, एनटीए सारख्या एका संस्थेची संकल्पना मांडण्यात आली. त्यानंतर, 2010 या वर्षात, संपूर्ण भारतात सर्व प्रकारच्या उच्च शिक्षण संस्थांच्या प्रवेश परीक्षा घेऊ शकेल, अशा आयोगाच्या स्थापनेचा विचार पुन्हा एकदा मांडण्यात आला. त्याचे काम, जागतिक संशोधनासह एक अशी यंत्रणा उभी करणे असेल, ज्याद्वारे विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला योग्य संधी आणि वाव मिळू शकेल. आणि या संधीचा मार्ग दाखवण्याचे, त्यासाठी मार्गदर्शन करण्याचे काम देखील याच संस्थेने करावे. मात्र हा विचार प्रत्यक्षात काही अस्तित्वात आला नाही. वर्ष 2014 मध्ये पुन्हा एकदा या दिशेने काम करण्याचे प्रयत्न सुरु झाले आणि अखेर 10 नोव्हेंबर 2017 रोजी मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर भारतीय संस्था नोंदणी अधिनियम 1860 अंतर्गत राष्ट्रीय चाचणी संस्था म्हणजेच एनटीए ची स्थापना करण्याची घोषणा करण्यात आली. मे 2018 मध्ये संस्थेची नोंदणी करण्यात आली. डिसेंबर 2018 मध्ये पहिल्यांदाच एनटीएच्या माध्यमातून राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) चे आयोजन करण्यात आले. आता एकाच वर्षात, 14 प्रकारच्या प्रवेश परीक्षा, फेलोशिप परीक्षा, विद्यापीठ पात्रता परीक्षेचे आयोजन एनटीए द्वारे केले जात आहे. दोन वर्षातच सुमारे 1.23 कोटी परीक्षार्थीनी एनटीएने आयोजित केलेल्या विविध परीक्षा दिल्या आहेत. भारतात पहिल्यांदाच, पूर्णपणे पेन आणि पेपरलेस परीक्षेची सुरुवात करण्याचे श्रेय, एनटीएलाच जाते. भारताच्या शैक्षणिक व्यवस्थेत सुधारणेची सर्वात मोठी सुरुवात, इथूनच झाली, असेही आपण म्हणू शकतो.

## एनटीएचा उद्देश : प्रवेश परीक्षांच्या माध्यमातून विश्वस्तरीय मानक स्थापन करणे:

एनटीएची घोषणा करतांना तत्कालीन मनुष्यबळ विकास मंत्री या नात्याने देशातील शिक्षण व्यवस्थेची जबाबदारी सांभाळणारे प्रकाश जावडेकर म्हणाले होते, "प्रवेशासाठी उमेदवारांच्या क्षमतेचे आकलन योग्य पद्धतीने व्हायला हवे.ते संशोधनावर आधारित असायला हवे. आंतरराष्ट्रीय मानकांनुसार, पूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि त्रुटीविरहित असावी. आपल्यासमोर दीर्घकाळापासून हे आव्हान राहिलेले आहे. याच विचारातून राष्ट्रीय चाचणी यंत्रणेची सुरुवात केली गेली आहे." प्रवेश परीक्षांच्या तयारीबाबत, परीक्षा घेण्याची आणि मूल्यमापनाची पूर्ण जबाबदारी एनटीएला देण्यात आली आहे. आज, 12 प्रकारच्या प्रवेश प्रक्रियांसोबतच, दोन विद्यापीठांच्या प्रवेश परीक्षाही एनटीए मार्फत केल्या जातात आणि त्याही एकही चूक अथवा त्रुटी न राहता !हे एनटीए चे महत्वाचे यशच म्हणता येईल.

राष्ट्रीय चाचणी यंत्रणा-एनटीए समाजाच्या समोर असलेल्या शैक्षणिक आव्हानांवर-जसे की साक्षरतेची पातळी- उत्तर शोधणे तसेच उच्च शिक्षणात प्रवेशासाठी गुणवत्ता वाढवणे अशा विषयांवरही लक्ष केंद्रीत करत आहे. आंतरराष्ट्रीय परीक्षा यंत्रणांच्या धर्तीवर पहिल्यांदाच प्रत्येक परीक्षेनंतर परीक्षा पॅटर्नवर आधारित माहितीचे सायकोमेट्रिक ॲनालीसिस म्हणजेच मनोमितीय विश्लेषण केले जाते. म्हणजे, परीक्षा देणारा एखादा

> *"एनटीए सारख्या संस्थाची स्थापना करावी हा विचार पहिल्यांदा 1986 च्या शिक्षण धोरणात मांडण्यात आला होता. या सरकारने 2018 साली एनटीए ची स्थपना करुन एक असे काम पूर्ण केले आहे, जे गेल्या 32 वर्षात होऊ शकले नव्हते. एनटीए ने गेल्या केवळ 2 वर्षातच सुमारे 45 परीक्षा घेतल्या आहेत. ज्यासाठी 1.23 कोटी परीक्षार्थीनी नोंदणी केली होती. या परीक्षांमध्ये सुमारे 33 भाषा, 13 परीक्षा माध्यमे आणि 450 विषय समाविष्ट आहेत. एनटीए, आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या परीक्षेत वापरल्या जाणा *या सायकोमेट्रिक अध्ययनाच्या आधारावर आपल्या प्रश्नपत्रिका तयार करते –*
> **डॉ. रमेश पोखरियाल निशंक, शिक्षा मंत्री**

विद्यार्थी विचारलेले प्रश्न कशा प्रकारे सोडवतो? कोणत्या प्रश्नासाठी त्याला किती वेळ लागतो? माध्यम भाषा वेगळी असेल तर त्याचा अनुवाद योग्य झाला आहे की नाही? म्हणजे- एखादा प्रश्न इंग्रजी ऐवजी हिंदीतून समजण्यास अधिक वेळ तर नाही लागला ना? वेगवेगळे प्रदेश किंवा बोर्डाच्या हिशेबाने त्याचे तुलनात्मक अध्ययन एनटीए चे तज्ञ करत असतात. या अध्ययनाचा पूर्ण डेटा तयार केला जातो. आणि हा डेटा विद्यार्थ्याशी संबंधित बोर्ड किंवा शिक्षण विभागालाही दिला जातो. या आधारावर शिक्षण पद्धतीत सुधारणा किंवा शिक्षकांच्या शिकवण्याच्या पद्धतीत बदल केले जातात, किंवा इतर काही आवश्यक उपाययोजना केल्या जातात. सायकोमेट्रिक डेटाचा वापर करून शिक्षकांच्या शिकवण्याच्या पद्धती पासून ते अभ्यासक्रमात सुधारणा करण्यापर्यंत उपाय केले जातात. सोबतच, एनटीए च्या तज्ज्ञांना या डेटाचा भविष्यात प्रश्नपत्रिका अधिक उत्तम करण्यासाठी देखील

उपयोग होतो. म्हणजेच सायकोमेट्रिक ॲनालीसिस सारख्या व्यवस्थेमुळे आपल्याला आपल्या शिक्षणव्यवस्थेचे प्रदीर्घ अध्ययन करण्याची संधी मिळते, ती या विद्यार्थ्यांच्या संकलित माहिती वरूनचा. **एनटीएच्या अजेंड्यात समाविष्ट असलेले हे तीन महत्वाचे मुद्दे आपण समजून घ्यायला हवेत.**

### मूल्यांकनात सुधारणा

*मूल्यांकनाच्या जुन्या पद्धतींच्या ऐवजी त्रुटीरहित ऑनलाईन मूल्यांकन व्हावे, त्यासोबतच नवनव्या कल्पनांच्या माध्यमातून भविष्यासाठी ही पद्धत आणखी उत्तम करता यावी, यावर भर देण्यात आला आहे. त्यासाठी आपल्या स्थापनेपासूनच एनटीए प्रवेश परीक्षांच्या मूल्यांकनावर भर देत सातत्याने संशोधन करत आहे.*

### संशोधन धोरण बनवणे

*सर्वसामान्य जनतेशी संबंधित मुद्द्यांवर संशोधनासहित मूल्यांकनाचे कामही एनटीए करते. एवढेच नाही, तर जगभरात धोरणात्मक गरजा पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आंतरराष्ट्रीय तुलनात्मक सर्वेक्षणाद्वारे संकलित आकडेवारी आणि माहितीचा उपयोग कसा केला जाऊ शकेल, याचा विचारही एनटीएच्या अजेंड्यात करण्यात आला आहे.*

### सर्वांसाठी समावेशक

*प्रवेश परीक्षा दिव्यांग व्यक्तींसाठीही अनुकूल(सोप्या) बनवण्यासोबतच निष्पक्षता राखण्यासाठी साठी एनटीए पूर्णपणे कटिबद्ध आहे. प्रत्येक परीक्षेच्या वेळी विद्यार्थ्यांच्या हितासाठी पावले उचलली जातात.*

## विद्यार्थ्यांसाठी सहज झाली परीक्षा

आपण एनटीएच्या स्थापनेला भलेही शिक्षण व्यवस्थेतील क्रांतीकारक पाऊल म्हणत असू, मात्र सर्वात मोठा प्रश्न हा आहे की परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी काय काय बदलले आणि नव्या व्यवस्थेचा त्यांना काय लाभ मिळाला? दरवर्षी विविध स्पर्धा परीक्षांना बसणाऱ्या 60 लाख पेक्षा अधिक विद्यार्थ्यांसाठी एनटीए ने ही नवी व्यवस्था लागू केली आहे. चला समजून घेऊया कशी आहे ही व्यवस्था..

## वर्षातून दोनदा परीक्षा होत असल्याने पर्याय निवडण्याची संधी

आयआयटी सह देशभरातल्या वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेशासाठी होणारी नॅशनल एलिजिबिलीटी कम एन्ट्रस टेस्ट (नीट) सारख्या परीक्षा आधी वर्षातून फक्त एकदाच होत असत. म्हणजे दीर्घकाळ या प्रवेश परीक्षेसाठी मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्यांना वर्षातून फक्त एकदाच संधी मिळत असे. आणि त्यातही निवड न झाल्यास, विद्यार्थ्यांमध्ये निराशा आणि तणाव येत असे. पुन्हा एकदा नव्याने त्यांना पूर्ण वर्षभर या परीक्षेची तयारी करावी लागत असे. मात्र एनटीए आता ऑनलाईन पद्धतीने या परीक्षा वर्षातून दोनदा आयोजित करते. दोन्ही परीक्षांपैकी ज्या परीक्षेत विद्यार्थ्याला अधिक गुण मिळाले असतील, तो निकाल अंतिम म्हणून ग्राह्य धरला जातो. यात विद्यार्थ्यांचा वेळ आणि पैशाची तर बचत होतेच, शिवाय एक प्रयत्न



अयशस्वी झाल्यास, पूर्ण वर्षभर तयारी करण्याचा तणावही कमी होतो.

## सुरक्षित, स्वच्छ व्यवस्थेद्वारे प्रतिभेला योग्य संधी

आधी सगळ्या परीक्षा ऑफलाईन होत असत. म्हणजे विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका आणि त्यासोबतच एक ओएमआर शीट दिली जात असे. ओएमआर शीट वर प्रश्नाच्या उत्तराच्या गोलाकार जागी बॉल पेनने रंग भरून नंतर ती उत्तरपत्रिका पर्यावेक्षकांकडे जमा करावी लागत असे. मात्र या व्यवस्थेत तीन त्रुटी होत्या. एकतर हे गोलाकार चिन्हित करतांना त्यात मानवी चूक राहण्याची शक्यता होती, जी नंतर सुधारणे शक्य नव्हते. दुसरी त्रुटी म्हणजे, परीक्षा संपल्यावर ओएमआर शीटमध्ये गडबड होण्याची शक्यता होती. तिसरी त्रुटी म्हणजे पेपर फुटल्याच्या अनेक तक्रारी आधी येत असत. मात्र, आता ही परीक्षा ऑनलाईन झाल्यामुळे ही पूर्ण व्यवस्थाच सुरक्षित, लिक-प्रूफ झाली आहे. एनटीए च्या तज्ञांनी तयार केलेली प्रश्नपत्रिका आता निश्चित वेळी एनक्रप्टेड फॉरमॅटमध्ये सरळ परीक्षार्थीच्या कॉम्प्युटर सिस्टीमवर उघडते.

## मुलाखत

# योग्य प्रतिभा ओळखणे आणि तिला अचूक संधी आणि वाव मिळवून देणे, हेच आमचे काम: विनीत जोशी

**भारतात प्रवेश परीक्षांविषयी कधीही इतका सखोल आणि सविस्तर विचार करण्यात आला नसेल. याच कारणामुळे आधी विद्यार्थी जी परीक्षा देत असत, ती एका निश्चित पॅटर्नवर आधारलेली साचेबध्द परीक्षा होती. अशा प्रकारच्या परीक्षेमुळे ना ही विद्यार्थ्यांच्या प्रतिभेला योग्य वाव मिळत असे आणि ना पुरेशी संधी मिळत असे. आपण या बाबतीत इतर देशांच्या तुलनेत कितीतरी मागे होतो. राष्ट्रीय चाचणी यंत्रणेने आता या परीक्षेच्या स्तरासोबतच, आता पूर्ण यंत्रणेत बदल करण्यात आला आहे. न्यू इंडिया समाचार चे सल्लागार संपादक, संतोष कुमार यांनी एनटीए चे संचालक विनीत जोशी यांच्याशी एनटीए ची कार्यशैली आणि तसेच त्याची आवश्यकता आणि भविष्यातील योजनांवर विस्तृत चर्चा केली. वाचा या मुलाखतीचे काही अंश..**

**प्रश्न : एनटीए ची स्थापना करण्यामागे सरकारचा काय उद्देश आहे?** भारतात होणाऱ्या सर्व प्रवेश परीक्षांमध्येआंतरराष्ट्रीय निकषांशी अनुरूप मापदंड स्थापन करणे, हा या यंत्रणेच्या स्थापनेमागील सरकारचा मुख्य उद्देश आहे. आम्ही प्रत्येक वेळी परीक्षेनंतर मिळणाऱ्या माहितीचे (डेटाचे) विश्लेषण करतो. आणि हे तपासतो की विद्यार्थ्यांना कोणते प्रश्न सोडवतांना कोणती समस्या येते आहे. कोणत्या बोर्डाच्या किंवा प्रदेशातील विद्यार्थ्यांना कोणते प्रश्न सोपे गेले किंवा कठीण गेले? एखाद्या प्रश्नाच्या अनुवादामुळे तर विद्यार्थ्यांना तो समजण्यास त्रास झाला नाही ना ? एखादी प्रश्नपत्रिका इंग्रजीत समजण्यास सोपी होती, पण हिंदी प्रश्नपत्रिकेत त्याचा अनुवाद योग्य झाला नाही, असे तर नाही झाले ना? इतर देशांमध्ये कशाप्रकारे काम चालते? आता एनटीए च्या माध्यमातून आपण ऑनलाईन परीक्षेनंतर मिळणाऱ्या माहितीचे विश्लेषण करतो. भविष्यात जेव्हा पुन्हा त्या परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका तयार केली जाते, त्यावेळी आधीच्या विश्लेषणातील सर्व बाबी लक्षात ठेवल्या जातात. हा डेटा शिक्षण मंडळाकडे देखील पाठवला जातो. या माध्यमातून शिक्षणाची पद्धतही अधिक उत्तम करण्यासाठी सातत्याने काम सुरु आहे.

**प्रश्न : सुरुवातीला कशाप्रकारच्या समस्यांचा सामना करावा लागला?**

उत्तर :- डिसेंबर 2018 मध्ये जेव्हा आम्ही पहिल्यांदा नेटची ऑनलाईन परीक्षा घेणार होतो, त्यावेळी त्याबद्दल अनेक प्रश्न, शंका उपस्थित केल्या गेल्या होत्या . त्यापैकी काही बाबींमध्ये तथ्यही होते. कारण सध्या तर आपण शालेय जीवनापासूनच मुलांना कॉम्प्युटर शिकवतो आहोत, पण पूर्वी असे नव्हते. अशा वेळी जे विद्यार्थी पदवीधर झाले आहेत आणि ज्यांना कॉम्प्युटरविषयी बेसिक माहितीही नाही, ते परीक्षा कशी देणार? मात्र, त्यावर उपाय म्हणून आम्ही प्रत्येक शहरात काही निश्चित केंद्रे तयार केलीत, जिथे जाऊन हे विद्यार्थी,परीक्षेचा सराव करु शकतात. एक ॲप पण तयार केले ज्यावरून मुलांना सराव करण्यासाठी नोंदणी करता येईल.आम्ही योग्य दिशेने पुढे गेलो, म्हणून यशस्वी होऊ शकलो. आज एनटीए च्या संकेतस्थळावर, प्रत्येक परीक्षेचे जुने प्रश्न सोडवण्यापासून मॉक टेस्टच्या माध्यमातून सराव करण्याची सुविधा आम्ही दिली आहे, जेणेकरुन कोणालाही ऑनलाईन परीक्षेच्या दरम्यान काही अडचण येऊ नये.

### नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात एनटीए की काय भूमिका आहे?

**प्रवेश परीक्षांच्या प्रक्रियेत सुधारणा करण्यात एनटीए ची भूमिका महत्वाची आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात संपूर्ण देशातील उच्चशिक्षण संस्थांमध्ये प्रवेशासाठी एका परीक्षेचा उल्लेख आहे. ही परीक्षा दोन भागात होणार आहे. पहिली- ॲप्टिट्यूड टेस्ट म्हणजे कलचाचणी. नव्या शैक्षणिक सत्रात (2021-22) उच्च शिक्षण संस्था, विशेषतः केंद्रीय विद्यापीठांमध्ये प्रवेश, या प्रवेश परीक्षांच्या माध्यमातून होऊ शकतो. सध्या तरी या प्रस्तावावर फक्त चर्चा झाली आहे, अंतिम निर्णय होणे अद्याप बाकी आहे.**



**आधीच्या व्यवस्थेत कोणत्या त्रुटी होत्या ज्या एनटीएमुळे दूर झाल्या आहेत?**

आधी जेव्हा प्रश्नपत्रिका तयार केल्या जात असत, तेव्हा त्यासाठी विश्लेषणाची काहीही व्यवस्था नव्हती. याच कारणामुळे अनेकदा ऐकू येत असे कधी परीक्षा सोपी असायची तर कधी कठीण असायची. मात्र आता ऑनलाईन परिक्षां सुरु झाल्यामुळे सगळा डेटा आपल्यापाशी असतो. यामुळे प्रश्नपत्रिका निश्चित उद्दिष्ट लक्षात ठेवून तयार केली जाते. त्याशिवाय आधी परीक्षा घेण्यासाठी खूप संसाधने लागत असत. ती पूर्ण प्रक्रियाचा खूप किचकट आणि वेळखाऊ होती. सीबीएसईचे अध्यक्ष या नात्याने मी ती सगळी प्रक्रिया अगदी जवळून बघितली आहे. तिथे एक निकाल तयार करण्यासाठी एक महिना लागत असे. इथे मात्र एका आठवड्यातच आम्ही निकाल तयार करू शकतो. याआधी एका विषयातील तज्ञ एकच प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी काम करत असे. कारण त्याच्याकडे इतर अनेक कामे देखील असत. एनटीए मध्ये आता आमच्याकडे सर्व विषयातील तज्ञ आहेत. आम्ही अनेक प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी त्यांची मदत घेऊ शकतो. याचाच परिणाम म्हणून, आम्ही अनेक परीक्षा वर्षातून दोनदा आयोजित करतो आहोत. या वर्षी आम्ही 25 परीक्षा आयोजित करतो आहोत.

**विद्यार्थ्यांना याचा लाभ कसा मिळतो आहे ?** ऑनलाईन चाचणी असल्यामुळे आम्ही वर्षातून दोन वेळा परीक्षा घेतो आहोत. जेईई तर यंदा वर्षातून चार वेळा होत आहे. हे पर्याय मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील तणाव दूर झाला आहे. एका परीक्षेत जर त्यांना यश नाही मिळाले तर दुसऱ्या परीक्षेवर लक्ष केंद्रित करुन अधिक मेहनत घेऊ शकतात. परीक्षेनंतर त्यांना ही चिंता भेडसावत नाही की मी ओएमआर शीट मध्ये चुकीच्या पद्धतीने तर चिन्हित केले नसेल ना? माझा रोल नंबर तर बरोबर लिहिला असेल ना. एकूण विचार केला, तर आम्ही त्यांचा तणाव कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रश्नपत्रिका तयार करण्याची पद्धतही मी आपल्याला सांगितली. आता विद्यार्थ्यांच्या समस्या आणि त्यांचे हित लक्षात घेऊन प्रश्नपत्रिका तयार केली जाते. पर्सेंटाईल विचारात घेऊन गुणवत्ता यादी तयार केली जाते. याचा सगळ्यात मोठा लाभ हा झाला आहे की आता एनटीएच्या एकाचवेळी सर्वांना समान संधी देत प्रत्येक विद्यार्थ्याची वेगळी योग्यता ओळखून त्यांच्या कुवतीनुसार त्याना संधी मिळवून दिली जाते.

**भविष्यात, एनटीएच्या विस्ताराच्या काय शक्यता आहेत?**

चीन मध्ये महाविद्यालयात प्रवेश मिळवण्यासाठी गावकाओ परीक्षा होते. सुमारे एक कोटी विद्यार्थी ती परीक्षा देतात. ही जगातली सर्वात मोठी परीक्षा आहे. मात्र ही परीक्षा केवळ काही भाषांमध्येच होते. मात्र एनटीए ने ज्या परीक्षा आयोजित केल्या, त्यात आम्ही 16 लाख परीक्षार्थींना आम्ही 16 भाषांमधल्या प्रश्नपत्रिका दिल्या. जागतिक निकषांच्या आधारासोबतच आम्ही देशातल्या सर्व प्रतिभावंत विद्यार्थ्यांना समान संधी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करतो आहोत. यामुळे भविष्यात एनटीए परीक्षा आयोजित करणारी ही जगातली सर्वात मोठी एजन्सी असेल. आम्ही सातत्याने हाही प्रयत्न करतो आहोत की प्रश्नपत्रिका अशा तऱ्हेने तयार केली जावी, ज्यातून विद्यार्थ्यांची खरी योग्यता समोर येऊ शकेल. आणि आमच्या शिक्षण व्यवस्थेपासून ते परीक्षेपर्यंत वैज्ञानिक/शास्त्रीय विचारांच्या पायावर आधारित एक उत्तम, सशक्त व्यवस्था उभारली जाऊ शकेल.

परीक्षार्थी यात योग्य त्या उत्तरांवर खूण करुन सबमिट करतात आणि गरज पडल्यास, या उत्तरात बदलही करु शकतात. परीक्षा संपल्यावर, संपूर्ण डेटा थेट एनटीएच्या सर्व्हर मध्ये जाऊन जमा होतो.

## प्रत्येक बारीक गोष्ट लक्षात ठेवून तयार केलेली प्रश्नपत्रिका

कोणत्याही परीक्षेची प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी एनटीए कडे तज्ञांची चमू आहे. आधीच्या परीक्षेत मिळालेल्या सायकोमेट्रिक ॲनालीसिसच्या माहितीवरुन डेटा आणि पॅटर्नचे विश्लेषण करून तज्ञ मंडळी नव्या परीक्षेची प्रश्नपत्रिका तयार करतात. प्रश्नपत्रिका तयार करतांना प्रत्येक गोष्टीचा बारकाईने विचार केला जातो. जसे की,

**परीक्षा कोण आणि काय उद्देशाने घेतली जाणार आहे ?**

**कोणत्या कौशल्य/ज्ञानाचे आकलन केले जाईल ?**

**परीक्षार्थी आपल्या ज्ञानाचा उपयोग कसा करु शकतील ?**

**चाचणी किती लांब (दीर्घ)असायला हवी ?**

चाचणी किती कठीण असायला हवी? यानंतर तयार केलेल्या प्रश्नपत्रिकेची सखोल समीक्षा केली जाते, आवश्यक ते बदल/दुरुस्त्या केल्या जातात. त्यानंतरच हे प्रश्नपत्रिका विद्यार्थ्यांपर्यंत पोचते. त्यानंतर देखील प्रत्येक प्रश्न आणि त्याचे अपेक्षित उत्तर याचे सखोल समीक्षण केले जाते. प्रश्नपत्रिकेत या बाबीकडे लक्ष दिले जाते की प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रतिभेच्या योग्य स्तराचे मूल्यांकन योग्य पद्धतीने केले जावे.

## आता वेळेचा होतोय सदुपयोग

परीक्षा ऑनलाईन होत असल्यामुळे या व्यवस्थेतले गैरप्रकार होण्याची शक्यता संपली आहे, त्याचवेळी, परीक्षा घेणारी यंत्रणा आणि विद्यार्थी,दोघांच्याही वेळेची बचत झाली आहे. मूल्यांकनात त्रुटी असण्याची शक्यता देखील संपली आहे. त्यासोबतच, आता निकालासाठी विद्यार्थ्यांना दीर्घकाळ प्रतीक्षा नाही करावी लागत

## आंतरराष्ट्रीय निकषांचा विचार

एनटीएद्वारे आयोजित प्रत्येक परीक्षेत आंतरराष्ट्रीय निकषांचा विचार केला जातो आणि त्याला अनुरूप असे अशीच परीक्षा घेतली जाते. प्रत्येक विषयाच्या तज्ञांना यासोबत जोडले गेले आहे. इतर देशात आयोजित होणा या स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करुन त्यासोबतच, तिथल्या यंत्रणांच्या तज्ञांशी देखील सल्लामसलत केली जाते. या प्रक्रीयेमुळे, वेळोवेळी प्रश्नपत्रिकेच्या पॅटर्नमध्ये बदल केला जातो.

वर्ष 2014 पासूनच केंद्र साकारचा हा प्रयत्न होता की देशाच्या शिक्षणव्यवस्थेत कौशल्य आणि व्यावहारिक ज्ञानासोबतच वैज्ञानिक ज्ञानाचाही समावेश व्हावा. त्यासाठीचा एनटीएच्या माध्यमातून जी सुरुवात वर्ष 2018 साली केली गेली होती, तीच पुढे नेत, आता केंद्र सरकारने 34 वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा आराखडा देशासमोर ठेवला आहे. ●

केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय

# विकासाला गती देण्याच्या उद्देशाने नवे स्त्रोत उभारण्यासाठी पुढाकार

**आर्थिक विकासाला जलद वेग देत आत्मनिर्भर भारताच्या दिशेने वेगाने पावले टाकत असलेल्या सरकारने पायाभूत सुविधांमध्ये गुंतवणुकीसाठी निधी उभारण्याच्या नव्या स्त्रोतांवर भर देण्यास सुरुवात केली आहे. जेणेकरुन विकासाचे काम थांबणार नाही आणि देशाची प्रगती देखील सुनिश्चित होईल.**



**निर्णय: आत्मनिर्भर भारताची संकल्पना साकार करण्याच्या दिशेने पायाभूत सुविधा- वित्तपुरवठा अधिकाधिक मजबूत व्हावा, यासाठी सरकारने विकास वित्त संस्था (एफडीआय) च्या स्थापनेला मंजुरी दिली आहे.**

**पार्श्वभूमी आणि प्रभाव**

- डीएफआय मुळे दीर्घकालीन निधी उभारण्यासाठी मदत मिळेल. या संस्थेला यावर्षीच्या सर्वसाधारण अर्थसंकल्पातून सुरुवातीचा निधी मिळेल. अर्थमंत्र्यांनी यंदाच्या अर्थसंकल्पात त्याची घोषणा केली होती.
- या वर्षासाठी 20 कोटी रुपयांची भांडवली गुंतवणूक. पुढच्या पाच वर्षात 3 लाख कोटी रुपयांपर्यंत निधी गोळा होईल, अशी अपेक्षा आहे. सुरुवातीचे अनुदान पाच हजार कोटी रुपये एवढे असेल आणि अतिरिक्त अनुदानात देखील नंतर वाढ होईल.
- डीआयएफमुळे इन्फ्रा-फायनान्सिंग –म्हणजेच पायाभूत सुविधांना निधी मिळवून देण्यात सहायभूत ठरेल आणि या योजनांना गति देण्याचे काम करेल.यामुळे मागणीत वाढ होऊन नव्या रोजगारनिर्मिती मुळे आर्थिक विकासालाही गती मिळेल.

**निर्णय : आर्थिक विकाससाठी ऊर्जा पायाभूत सुविधा सशक्त करण्यासाठी अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम येथे ऊर्जा पारेषण आणि वितरण प्रणाली अधिक सुदृढ करण्यासाठी सुधारित अंदाजांना मंजुरी.**

**पार्श्वभूमी आणि प्रभाव**

- 9129.32 कोटी रुपयांचे सुधारित खर्च अंदाज. या योजनेसाठीचा संपूर्ण खर्चाचा भार केंद्र सरकार उचलेल
- ही योजना पॉवरग्रिड च्या माध्यमातून कार्यान्वित केली जात आहे आणि या वर्षी डिसेंबर पर्यंत तिला टप्प्याटप्प्याने त्सुरू करण्याचे उद्दिष्ट आहे.
- या योजनेमुळे, प्रति व्यक्ती विजेच्या वापरात वाढ होईल तसेच ही योजना राज्यांच्या आर्थिक विकासातही योगदान देईल.
- स्थानिक लोकांसाठीही मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील।

**निर्णय : हँडीक्राफ्ट अँड हँडलूम एक्सपोर्ट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड बंद करण्यास मंजुरी**

**पार्श्वभूमी आणि प्रभाव :** जे सुरु नाहीत आणि ज्यांच्यामधून पुरेसे उत्पन्न मिळत नाही, असे आजारी उपक्रम बंद केल्यामुळे सातत्याने वाढत असलेल्या सरकारी खर्चात कपात होऊ शकेल. वित्त वर्ष 2015-16 पासून हे महामंडळ सातत्याने तोट्यात जात होते. महामंडळ संचालनाचा खर्च उचलण्याइतकेही उत्पन्न मिळवण्यास ते सक्षम नव्हते. या तोट्यातून त्याला अबाहेर काढणे शक्य नव्हते, त्यामुळे ते बंद करण्याशिवाय पर्याय नव्हता. या महामंडळात 59 स्थायी कर्मचारी आणि 6 व्यवस्थापन प्रशिक्षणार्थी आहेत, या सर्वांनाऐच्छिक सेवानिवृत्तीचा लाभ घेण्याची संधी दिली जाईल. •




# लसीकरण आणि आरोग्य सुविधांमध्ये भारताची आगेकूच

**कोरोना विरोधातील निर्णायक लढाईमध्ये भारत सावधगिरीने असे प्रत्येक पाऊल उचलत आहे जे जनजीवन आणि देशातील व्यवस्था सुरळीत करत आहे.जगातील सर्वात मोठ्या लसीकरण मोहिमेला पुढे घेऊन जात भारत आता 45 वर्षे आणि त्यापेक्षा जास्त वयाच्या लोकांनाही लसींच्या मात्रा देण्याच्या मोठ्या कार्यक्रमासोबतच आरोग्य सुविधांसंदर्भात अशा व्यवस्था निर्माण करत आहे ज्याचे जग देखील अनुकरण करत आहे.**

जांचणी, देखरेख आणि उपचार ( टी3) च्या प्रक्रियेला कठोरपणे लागू करत एकीकडे कोरोना विरोधातील लढाई सुरू आहे तर दुसरीकडे लसीकरण मोहिमेची व्याप्ती वाढवून ती गतिमान करण्यात आली आहे. देशभरात राबवण्यात येत असलेल्या कोरोना प्रतिबंधक लसीकरण मोहिमेबाबत केंद्र सरकारने अतिशय महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आता 45 वर्षे आणि त्यापेक्षा जास्त वयाच्या सर्व लोकांचे लसीकरण करण्यात येणार आहे. आतापर्यंत केवळ गंभीर श्रेणीत समाविष्ट असलेल्या 45 वर्षांवरील लोकांनाच लस दिली जात होती. त्यासाठी लाभार्थ्यांना अधिकृतपणे प्रमाणपत्र दाखवावे लागत होते. देशामध्ये लसींचा साठा पुरेशा प्रमाणात आहे आणि दोन्ही लसी प्रभावी आहेत हे देखील केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे कारण स्वतः पंतप्रधानांनी कोवॅक्सिनची लस घेऊन त्यावर शिक्कामोर्तब केले आहे. कोरोना विरोधातील लढाईत शास्त्रज्ञ- विशेषज्ञ यांचा सल्ला सर्वाधिक महत्त्वाचा मानून केंद्र सरकार काही धोरणात्मक बदल करत आहे. याच मालिके अंतर्गत रोगप्रतिकारक्षमताविषयक राष्ट्रीय तांत्रिक सल्लागार( नटागी) आणि लसीकरण विषयक राष्ट्रीय उच्चस्तरीय प्रशासकीय समूह( नॅगवॅक) ने दिलेल्या सल्ल्यानुसार कोविशील्ड लसीची दुसरी मात्रा घेण्याचा कालावधी 4 ते 6 आठवड्यावरून वाढवून 4 ते 8 आठवडे करण्यात आला आहे. आरोग्य क्षेत्रात भारताच्या

# लसींच्या नव्या तरतुदी
## ज्या जाणून घेणे आहे गरजेचे

- कोविशिल्ड लसींच्या दोन मात्रांमध्ये आवश्यक असलेल्या 4 ते 6 आठवड्यांच्या कालावधीत वाढ करून तो 4 ते 8 आठवडे केला.
- जरी तुमच्या दुसऱ्या मात्रेसाठीची तारीख आपोआप निर्धारित केली गेली असेल तरीही तुम्ही विस्तारित कालावधीमधील एक निश्चित दिवस आणि तारीख यांची निवड करू शकता. आपली भेटीची वेळ पुन्हा निश्चित करण्यासाठी www.cowin.gov.inला भेट द्या.
- 45 वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त वयाचे सर्व लोक लस घेऊ शकतात, त्यासाठी आता कोणत्याही गंभीर आजाराने ग्रस्त असण्याची गरज नाही.
- 1 जानेवारी 1977 पूर्वी जन्मलेले सर्व लोक लसीकरणासाठी पात्र आहेत.
- कोविन प्रणालीवर नोंदणी आणि भेटीची वेळ देण्याची प्रक्रिया 1 एप्रिल 2021 पासून सुरू झाली आहे. या तारखेपासून ऑनलाईन बरोबरच ऑनसाईट नोंदणीची देखील सोय करण्यात आली आहे.
- कोविन ॲपवर लसीकरणासाठी आगाऊ भेटीच्या वेळेची नोंदणी करणाऱ्या लाभार्थ्यांना खाजगी किंवा सरकारी रुग्णालयात पुन्हा भेटीची वेळ नोंदवण्याची गरज नाही.
- जर एखादे रुग्णालय लसीकरणाच्या प्रमाणपत्राच्या तरतुदीसह नव्या लसीकरणविषयक मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन करत असेल तर त्या रुग्णालयाची तक्रार तुम्ही 1075 या टोल फ्री क्रमांकावर करू शकता.
- देशात लसींची कोणतीही कमतरता नाही आणि लोकांनी अनावश्यक भीती बाळगू नये.

# सावधगिरी अद्यापही गरजेची कारण पुन्हा वाढत आहे कोरोना रुग्णसंख्या

कोरोना रुग्णांच्या संख्येत पुन्हा एकदा वाढ होत आहे. अशा वेळी आपल्याला दक्षता घेणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात अनेक भागांमध्ये मोठ्या प्रमाणात कोरोना रुग्ण आढळत आहेत. 4 एप्रिलला संपूर्ण देशभरात 1,03,794 नवे रुग्ण आढळले. यामध्ये एकट्या महाराष्ट्रातील 54,074 रुग्णांचा समावेश होता. तिथे सर्व जिल्ह्यांमध्ये रात्रीची संचारबंदी लावण्यात आली आहे.

**7,41,830**
एकूण उपचाराधीन रुग्ण

| 1,16,82,136 | 1,65,101 | 92.80% |
|---|---|---|
| बरे झालेले रुग्ण | मृत्यु | बरे होण्याचा दर |

**मृत्यु दर (1.31%)** 5 एप्रिल पर्यंतच्या आकडेवारीनुसार



**5 एप्रिल पर्यंतच्या आकडेवारीनुसार सुमारे 7,91,05,163 लोकांना लस देण्यात आली आहे.**

**वॅक्सीन मैत्री...29 मार्च पर्यंत भारताने जगातील 84 देशांना कोरोना लसींच्या 6 कोटी 45 लाख 26 हजार मात्रा पाठवल्या आहेत. यामध्ये 1 कोटी 5 लाख मात्रा भेटीच्या स्वरुपात दिल्या आहेत.**

## वेळेपूर्वीच पूर्ण झाले हेल्थ वेलनेस सेंटरचे उद्दिष्ट

पहिल्यांदाच आरोग्य हा एखाद्या सरकारच्या जाहीरनाम्याचा प्रमुख आधारस्तंभ बनला आहे. त्याचाच परिणाम म्हणून 31 मार्च 2021 पर्यंत 70 हजार हेल्थ वेलनेस सेंटर उभारण्याचे लक्ष्य 10 दिवस आधीच पूर्ण करण्यात आले. म्हणजेच 21 मार्च 2021 पर्यंत देशात 70,015 आयुष्मान भारत हेल्थ वेलनेस सेंटर सुरू झाली आहेत. 41.35 कोटी लोकांनी यांचा लाभ घेतला आहे.

## डिजिटल आरोग्य सेवेतदेशाची ई- संजीवनी

कोरोना काळात केवळ काही महिन्यांपूर्वी सुरू झालेल्या टेलिमेडीसीन सेवा- ई संजीवनीने मोठी कामगिरी करत 30 लाखांपेक्षा जास्त सल्ले दिले आहेत. ही सेवा 31 राज्ये- केंद्रशासित प्रदेशांमध्ये सुरु आहे आणि दररोज देशातील 35 हजारांपेक्षा जास्त रुग्ण या सेवेचा वापर करत आहेत. ई- संजीवनी ओपीडी अंतर्गत 21 लाख लोकांना सेवा देण्यात आली आहे.

अभूतपूर्व कार्यक्रमाचाचहा परिणाम आहे ज्यामुळे बिगर संसर्गजन्य आजाराने होणाऱ्या अकाली मृत्यूंचा दर कमी करण्यात भारताने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ज्याची संयुक्त राष्ट्रांच्या प्रशिक्षण आणि संशोधन (UNITAR) या संस्थेने देखील प्रशंसा केली आहे. कारण बिगर संसर्गजन्य आजारांचा प्रतिबंध करण्यासाठी आणि आरोग्य व्यवस्था बळकट करण्यासाठी पावले उचलणाऱ्या देशांमध्ये भारत सर्वांच्या पुढे आहे.



# टपाल बँक | तुमची बँक तुमचे दार

**जीएसटी, आधार आणि जनधन खात्यांसोबत देशाच्या अर्थव्यवस्थेला एक नवे रुप देण्याच्या मालिकेत 1 सप्टेंबर 2018 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले स्वतःचे खाते उघडून इंडिया पोस्ट बँक सुरू केली होती. उद्देश हा होता की देशाच्या दुर्गम भागांपर्यंत पोहोचलेल्या सव्वा लाख टपाल कार्यालयांच्या आणि 3 लाख पोस्टमनच्या विशाल जाळ्याचा उपयोग सर्वसामान्य माणसाच्या हितासाठी करता यावा आणि त्यांना बँकिंग सेवा घरपोच मिळावी...**

तामिळनाडूच्या मुगैयूऊर( थोपू) गावात राहणारे सुंदरम हे ज्येष्ठ नागरिक शारीरिकदृष्ट्या सक्षम नाहीत. त्यांच्या साठी सर्वात जवळ असलेली सरकारी बँकेची शाखा 10 किलोमीटरवर आहे. दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिक असल्या कारणाने पैसे काढण्यासाठी बँकेत जाणे त्यांच्यासाठी एखाद्या आव्हानाप्रमाणे होते. त्यांची अडचण पाहिल्यावर पोस्टमास्तर अरुण सेल्वा कुमार यांनी त्यांना टपाल कार्यालयाद्वारे चालवल्या जाणा या आधार संलग्न पेमेंट प्रणाली सेवेविषयी माहिती दिली. त्यामुळे सुंदरम यांना आता पैसे काढण्यासाठी दहा किलोमीटर अंतर कापावे लागत नाही किंवा पैसे काढण्यासाठी असलेल्या फॉर्मवर माहिती भरण्यासाठी बँक कर्मचा यांच्या विनवण्या कराव्या लागत नाहीत. आता पोस्टमनकडे असलेल्या बायोमेट्रिक उपकरणावर अंगठा लावून त्यांना सहजपणे पैसे काढता येतात. आज जर देशातील कोट्यवधी लोकांना केवळ अंगठा लावून सहजतेने आपले पैसे काढता येऊ लागले असतील तर त्याचे कारण आहे इंडिया पोस्ट पेमेंट बँक. दळणवळण मंत्रालयांतर्गत पथदर्शी प्रकल्प म्हणून रांची आणि रायपूरपासून सुरू झालेली ही सेवा आता देशाच्या प्रत्येक जिल्ह्यात उपलब्ध आहे.

## आता तुमच्या घरी आली बँक

खाते उघडायचे असेल किंवा आपल्या खात्यामधील एखाद्या सुविधेचा लाभ घ्यायचा असेल, तर आता केवळ एक मेसेज पाठवून पोस्टमनला आपल्या घरी बोलावून या सुविधांचा लाभ तुम्ही घेऊ शकता. इंडिया पोस्ट पेमेंट्स बँक( आयपीपीबी) सामान्य माणसासाठी एक सोपी, स्वस्त आणि विश्वासार्ह बँक आहे. शहरी आणि ग्रामीण भागांमध्ये यासाठी 1 लाख 36 हजार 78 ऍक्सेस पॉइंट सुरू करण्यात आले आहेत. बँकिंग सेवांसाठी 25 हजार 239 काउंटर तयार केले आहेत. इतकेच नाही, देशभरात 2.90 लाख पोस्टमन या सर्व बँकिंग सेवा मोबाईल फोन आणि बायोमेट्रिक उपकरणे घेऊन तुम्हाला घरपोच देण्यासाठी सज्ज आहेत.

### कोरोना महामारीच्या काळात टपाल बँकिंगची भूमिका...

- लॉकडाऊन आणि अनलॉकच्या पहिल्या टप्प्यात कोअर बँकिंग सेवा( सीबीएस)-पोस्ट ऑफिस सेविंग्ज अकाउंट( पीओएसबी) काउंटर ऑपरेशनच्या माध्यमातून 48.82 कोटी वेळा 9.86 लाख कोटी रुपयांचे व्यवहार झाले.
- पीओएसबी एटीएमच्या माध्यमातून सुमारे 1.06 कोटी वेळा 3551 कोटी रुपये काढले गेले.
- कोरोनाच्या आधी आणि 1 सप्टेंबर 2019 पासून 24 मार्च 2020 या दरम्यान आयपीपीबीने 25.7 लाखापेक्षा जास्त एईपीएसने 848 कोटी रुपये वितरित केले.

## दोन सेवा ज्यांचा पहिल्यांदाच झाला प्रारंभ...

- पोस्टमन आणि ग्रामीण टपाल कार्यालयांच्या माध्यमातून प्रत्येक घरापर्यंत बँकिंग सेवा पोहोचवणे

*" इंडिया पोस्ट पेमेंट्स बँकेच्या माध्यमातून देशभरातील दुर्गम डोंगराळ भागात जंगलात राहणाऱ्या लोकांच्या घरांपर्यंत बँक पोहोचवण्याचा संकल्प पूर्ण करण्याचा मार्ग खुला झाला आहे. आता आम्ही बँकांना गावांपर्यंत आणि गरीबांच्या दारापर्यंत पोहोचवत आहोत. " बँक तुमच्या दारी" ही आमची वचनबद्धता आहे.-*

—— **नरेंद्र मोदी, पंतप्रधान**



- अशा सहाय्यक सेवा उपलब्ध करा, ज्या अशा लोकांची मदत करतील ज्यांना डिजिटल बँकिंगमधील बदलांविषयी अजिबात माहिती नाही

## असा झाला टपाल बँकिंग सेवांचा प्रारंभ

वर्ष होते 1833, जेव्हा कलकत्त्यामध्ये ( आताचे कोलकाता) देशातील पहिली सरकारी बचत बँक सुरू झाली. त्यानंतर डिस्ट्रीक्ट बँक, प्रेसीडेन्सी बँक, रेल्वे बँक आणि रेजिमेंटल बँक यांसारख्या अनेक सरकारी बँका सुरू करण्यात आल्या. त्यानंतर बचत बँक कायदा लागू करण्यात आला ज्यामुळे या योजनेची एक कायदेशीर चौकट तयार झाली. पोस्ट ऑफिस बचत बँकेने 1 एप्रिल 1882 पासून आपले कामकाज सुरू केले आणि त्यानंतर टप्प्याटप्प्याने उपरोक्त सर्व बँकांचे पोस्ट ऑफिस बचत बँकेमध्ये विलिनीकरण झाले. 1947 मध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर तत्कालीन भारत सरकारला वाटले की बचत प्रक्रिया आणखी गतिमान केली पाहिजे आणि त्यानंतर 1948 मध्ये राष्ट्रीय बचत संघटना एनएसओ( आता एनएसआय) स्थापन करण्यात आली. भारतात तर ही टपाल कार्यालय बँकिंगची सुरुवात होती तर इंडिया पोस्ट पेमेंट बँकेने टपाल बँकिंगची पातळी सर्वोच्च स्थानावर नेण्याचे काम केले आहे.

## तुम्ही या प्रकारे लाभ घेऊ शकता...

इंडिया पोस्ट पेमेंट ॲपच्या माध्यमातून तुम्ही तुमचे खाते उघडू शकता. त्याव्यतिरिक्त जवळच्या टपाल कार्यालयात जाऊनही खाते उघडता येऊ शकते.

# सध्या सुरू असलेल्या योजना

- **टपाल कार्यालय बचत खाते( एसबी) :** सुरुवातीला केवळ 500 रुपये भरून तुम्ही टपाल कार्यालयात बचत खाते उघडू शकता
- **5 वर्षीय टपाल कार्यालय आवर्ती जमा खाते( आरडी) :** लहान बचतीचा मोठा आधार. पाच वर्षांच्यामॅच्युरिटी कालावधीसाठी कमीत कमी मासिक 100 रुपयांनी टपाल कार्यालय आरडीची सुविधा देते.
- **टपाल कार्यालय मुदत ठेव जमा खाते(टीडी) :** टपाल कार्यालयात कमीत कमी 1000 रुपये भरून टाईम डिपॉझिट खाते उघडता येते. या योजनेत पाच वर्षांसाठी केलेल्या गुंतवणुकीवर 80 सी अंतर्गत करसवलत मिळते.
- **राष्ट्रीय बचत मासिक उत्पन्न खाते( एमआयएस) :** दरमहा 1000 च्या पटीत पैसे जमा करता येतात. यावर 6.6 टक्के दराने व्याज मिळते.
- **ज्येष्ठ नागरिक बचत योजना खाते:** 60 वर्षांपेक्षा जास्त वयाची कोणतीही व्यक्ती किंवा 55 ते 60 वयोगटातील निवृत्त सरकारी कर्मचारी हे खाते उघडू शकतात. यावर 7.4 टक्के व्याज मिळते.
- **पब्लिक प्रॉव्हिडंट फंड खाते:** एका आर्थिक वर्षात किमान 500 आणि कमाल 1,50,000 रुपये जमा करता येतात. यावर 80सी अंतर्गत करसवलत मिळवता येते.
- **सुकन्या समृद्धी खाते:** आर्थिक वर्षात किमान 250 आणि कमाल 1,50,000 रुपये जमा करता येतात. करसवलतीचा लाभ मिळेल.
- **राष्ट्रीय बचत प्रमाण पत्र :** यामध्ये गुंतवणुकीची कोणतीही कमाल मर्यादा नाही. मॅच्युरिटी कालावधी 5 वर्षे आहे.
- **किसान विकास पत्र :** कोणतीही व्यक्ती किमान 1000 रुपये गुंतवणूक करू शकते. 124 महिन्यांनी तुम्हाला 6.9 टक्के दराने गुंतवणूक केलेली रक्कम दुप्पट करून दिली जाते.
- **वेस्टर्न यूनियन मनी ट्रांसफर सर्विस:** ऑनलाईन पैसे मागवणे किंवा पाठवण्याची सुविधा
- या व्यतिरिक्त टपाल कार्यालयात दीर्घ मुदतीची गुंतवणूक योजना यूटीआय सोबत नॅशनल पेन्शन स्कीम आणि अपघात विमा योजना जन सुरक्षा योजनेचा देखील लाभ मिळू शकतो.●




# सुविधांचे महामार्ग



**रस्ते निर्मितीची गती असो किंवा रस्त्याच्या शेजारी प्रवाशांसाठी- ट्रक चालकांसाठी अनुकूल असलेल्या सुविधांचा विकास असो किंवा पायाभूत सुविधांचा कायापालट करणे असो किंवा मग पर्यटक वाहनांसाठी एक देश एक व्यवस्था उपक्रम असो, या सर्वांनाच केंद्र सरकारची विकासाविषयी असलेली वचनबद्धता आता नवनवे आयाम देत आहे जेणेकरून जनजीवन आरामदायी होईल आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील.**

महामार्गावरून नेहमी प्रवास करणा या इंदू म्हणतात, “ या ठिकाणी ठराविक अंतरावर स्वच्छतागृहांची सोय असली पाहिजे.” तर असेच आणखी एक प्रवासी असलेले यदुवीर सिंह यांना तर प्रवासादरम्यान राहण्याची सोय हवी आहे, हुसैन अब्बास यांना प्रवासात चांगले हॉटेल, स्वच्छ आणि नीटनेटकी खाण्यापिण्याची सोय हवी आहे. रस्त्यावर स्वतःच्या वाहनाने किंवा पर्यटक वाहनातून प्रवास करणा या या प्रवाशांपेक्षा ट्रक चालक हरी राम यांची अपेक्षा वेगळी आहे. ते सांगतात की ट्रकमधून मालवाहतूक करताना त्यांना एका राज्यातून दुस या राज्यात जात असताना अनेक रात्री प्रवासात काढाव्या लागतात. त्यामुळे अशा परिस्थितीत महामार्गांच्या शेजारी खाण्यापिण्याची, आंघोळ आणि स्वच्छतेची, गाडी उभी करण्याची आणि चार-पाच तास आराम करण्याची सोय असावी असे त्यांचे म्हणणे आहे. दुसरे एक ट्रक चालक जितेंद्र चौहान यांच्या म्हणण्यानुसार दर 40 ते 60 किलोमीटरवर अशी सोय असली तर बरे होईल.

आता इंदू, यदुवीर सारखे प्रवासी आणि हरीराम , जितेंद्र यांच्यासारख्या ट्रकचालकांचे स्वप्न साकार होऊ लागले आहे कारण एनएचएआयच्या पुढच्या उपक्रमांतर्गत वैयक्तिक वाहन चालक, ट्रक चालक आणि सहाय्यक चालकांसाठी जागतिक दर्जाच्या सुविधा विकसित केल्या जात आहेत. यासाठी जागतिक पातळीच्या मार्गदर्शक तत्वांनुसार योजना तयार करण्यात आली आहे. त्यानुसार दर 40 ते 60 किलोमीटर अंतरावर महामार्गांच्या शेजारी जनसुविधा विकसित करण्याची तरतूद आहे. सर्व मालवाहतूक मार्गिका आणि ग्रीनफील्ड द्रुतगती मार्ग यांना समाविष्ट करत रस्त्यांच्या कडेला जनसुविधांचे देशव्यापी जाळे विकसित करण्याचे कामएनएचएआय करत आहे. या सुविधांमध्ये पेट्रोल पंप, फूड कोर्ट, रेस्तराँ, ढाबा, दुकाने,

## तिप्पट वेगाने होत आहे महामार्गांची निर्मिती



आता दररोज 34 किमी लांबीचे महामार्ग तयार होत आहेत. त्याउलट 2014 मध्ये ही गती दिवसाला केवळ 12 किमी होती. इतकेच नाही तर 2020-21 या आर्थिक वर्षात प्रत्यक्षात 11 हजार किमी मार्ग बांधण्याचे लक्ष्य निर्धारित केले असताना, 12,205 किमी पेक्षा जास्त लांबीचे महामार्ग बांधून देशाने आणखी एक मैलाचा दगड पार केला आहे. त्यामुळे 1205 किमी लांबीचे अतिरिक्त रस्ते वेळेपूर्वीच ( 22 मार्च पर्यंत ) बांधून तयार झाले आणि एक नवा विक्रम प्रस्थापित झाला आहे.

## 18 तासात 25 किमी महामार्ग, लिम्का बुकमध्ये नोंद



पायाभूत सुविधांच्या विकासात देशभरात सुरू असलेल्या कामांमध्ये राष्ट्रीय महामार्गांच्या निर्मितीमध्ये देशाने एक आगळावेगळा विक्रम प्रस्थापित केला आहे. हा विक्रम सोलापूर- विजापूर दरम्यान चार पदरी मार्गावरील 25.5 किमी लांबीची एक मार्गिका केवळ 18 तासात पूर्ण केल्याने झाला आहे. एनएचएआयच्या या कामगिरीची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली आहे. 110 किमी लांबीच्या या महामार्गाचे गेल्या वर्षी उद्घाटन झाले होते.

## प्रवास आणि पर्यटनाला प्रोत्साहन



कोणत्याही राज्याच्या सीमेवर प्रवेश करताना पर्यटक वाहनांना शुल्क भरताना विलंब लागत असे. मात्र, आता केंद्र सरकारच्या एक देश एक व्यवस्था या दिशेने एक मोठे पाऊल उचलण्यात आले आहे. 1 एप्रिल पासून अखिल भारतीय पर्यटक वाहन परमिट नियम लागू झाला आहे. त्यामुळे आता पर्यटक वाहन संचालकांना ऑनलाईन माध्यमातून अखिल भारतीय पर्यटक परवान्यासाठी अर्ज करता येणार आहे. एका वेळी तीन वर्षांपर्यंतची परवानगी मिळू शकते.



**“ एनएचएआय पुढील पाच वर्षात देशातील 600 पेक्षा जास्त ठिकाणी महामार्गांच्या शेजारी प्रवाशांना उपयुक्त ठरतील अशा जनसुविधा विकसित करणार आहे, ज्यामुळे लाखो लोकांसाठी एक नवी संधी उपलब्ध होईल आणि प्रवाशांचा प्रवास सुकर बनवण्याबरोबरच ट्रक चालकांच्या आयुष्यात सुधारणा होतील- नीतीन गडकरी, केंद्रीय रस्तेवाहतूक आणि महामार्गमंत्री**

वैद्यकीय सुविधा, स्थानिक हाट- बाजार आणि स्वच्छ प्रसाधनगृहे यांचा समावेश आहे. पुढील पाच वर्षांमध्ये 600 पेक्षा जास्त ठिकाणी अशा प्रकारच्या सुविधा विकसित केल्या जाणार आहेत. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण( एनएचएआय) देशातील सर्वात मोठा पायाभूत सुविधा विकास कार्यक्रम ‘ भारतमाला प्रकल्प’ राबवत आहे, ज्याअंतर्गत देशात अनेक महामार्ग आणि द्रुतगती मार्ग विकसित करण्यात येत आहेत. केंद्र सरकार या प्रकल्पांचा विकास देखील 5,35,500 कोटी रुपयांच्या गुंतवणुकीने राबवल्या जाणा या भारतमाला प्रकल्पांतर्गतच करत आहे.

**चारी दिशांना होईल सुविधांचा विकास:** या प्रकारच्या सुविधांचा विकास 3 हजार हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रात केला जाणार आहे. यामध्ये उत्तरेत 67, पूर्वेला 40, पश्चिमेला 29, दक्षिणेला 45, दिल्ली मुंबई द्रुतगती मार्गावर 94, ग्रीनफील्ड द्रुतगती मार्गांवर 376 जागा निर्धारित करण्यात आल्या आहेत.

**ट्रक चालकांसाठी डॉरमेट्री:** ट्रक चालकांना आपल्या ट्रकमध्ये भरलेल्या मालाची काळजी न करता निवांत आराम करता आला तर त्यांचा प्रवास आणखी सुखद होईल, कारण यासाठी देखील डॉरमेट्री तयार करण्यात येणार आहे. काही मोठ्या जागांवर आकस्मिक कारणांसाठी हेलिपॅडची देखील सुविधा असेल.

**स्थानीय कलेला चालना मिळेल:** हाट आणि बाजारांचा विकास केल्यामुळे स्थानिक व्यावसायिकांना आपल्या स्थानिक कलाकृती ग्राहकांसमोर मांडण्याची आणि विक्री करण्याची संधी मिळेल. ज्यामुळे पूर्ण हस्तकला आणि कुटीरोद्योगांना देखील प्रोत्साहन मिळेल.

**व्यावसायिकांना सवलती:** या प्रकल्पांमध्ये समावेश करण्याच्या निकषांमध्ये ढाबे, रेस्तराँ, पेट्रोल पंप मालक, हॉटेल आणि मोटेल चालक यांच्यासह विविध व्यावसायिकांच्या भागीदारीला प्रोत्साहन देण्यासाठी आता पुरेशा सवलती देखील देण्यात आल्या आहेत.आरामदायक प्रवासामध्ये अशा सुविधांमुळे केवळ प्रवासाचा आनंदच वाढत नाही तर विकासाचा वेग देखील वाढतो. त्यामुळे केंद्रीय रस्ते आणि महामार्ग मंत्रालयाची ही योजना आत्मनिर्भर भारत अभियानात महत्त्वाची ठरणार आहे.




# चिरंजीवी

## भारत-बांग्लादेश मैत्री

समान ऐतिहासिक वारसा, भाषिक आणि सांस्कृतिक संबंध, संगीत, साहित्य आणि कलेप्रति लगाव, भारत-बांग्लादेश दरम्यान द्विपक्षीय संबंधांचा महत्वपूर्ण आधार आहे. आता बांगलादेशचे राष्ट्रपिता शेख मुजीबुर्रहमान यांचे जन्म शताब्दी वर्ष, बांग्लादेशचे स्वातंत्र्य आणि भारताबरोबर त्याच्या संबंधांना 50 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 26- 27 मार्च रोजी ढाका भेटीतून दोन्ही देशांच्या संबंधांमध्ये नव्या युगाची झाली सुरुवात, जिथे पंतप्रधानांनी संदेश दिला - “भारोत बांग्लादेश मोईत्री चिरोजीबि होख।”

एक वेगळा स्वतंत्र देश म्हणून डिसेंबर 1971 मध्ये जगाच्या नकाशावर उदयाला येत असलेल्या बांग्लादेशला मान्यता देणारा भारत हा पहिला देश होता. बांग्लादेशच्या विकासात भारत हर प्रकारे मदत करणाऱ्या शेजाऱ्याची भूमिका पार पाडत आला आहे. मात्र कोरोना काळानंतर ज्या वेगाने क्षेत्रीय आणि जागतिक राजनैतिक स्थिती बदलत आहे, त्यामुळे दोन्ही देशांदरम्यान दृढ संबंधांची गरज आता अधिकच भासू लागली आहे. अशा वेळी जेव्हा शेजारी राष्ट्र आपल्या स्वातंत्र्याची 50 वर्षे आणि आपल्या राष्ट्रपित्याचे जन्म शताब्दी वर्ष साजरे करत असताना, ‘शेजारी प्रथम धोरणावर ‘पुढे पाऊल टाकत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कोरोना काळात वर्षभरानंतर परदेश दौऱ्याची सुरुवात बांगलादेशपासून करत संबंधांना नवा आयाम देण्यात पुढाकार घेतला आहे. 26-27 मार्च रोजी बांग्लादेशची राजधानी ढाका इथे दाखल होऊन पंतप्रधान मोदी यांनी मेळ साधणाऱ्या सभ्यता-संस्कृती जपणाऱ्या बांग्लादेश बरोबर सामाजिक-आर्थिक संबंधांना नवी गती दिली आहे. पंतप्रधानांनी बंगबंधूंच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित बांग्लादेशच्या राष्ट्रीय दिनाला संबोधित केले. तसेच ओराकंदी येथे ठाकुरबाड़ी मंदिरात पूजा केली आणि मातुआ समुदायाला देखील संबोधित केले. दोन्ही देशांदरम्यान द्विपक्षीय संबंधांच्या बाबतीत संयुक्त निवेदन देखील जारी

करण्यात आले, ज्यात बांग्लादेशने भारताचे निरंतर सहकार्याबद्दल आभार मानले तर भारताच्या वतीनेही बांग्लादेशच्या विकासाची प्रशंसा केली. प्रांत आणि जगात भागीदारी मजबूत करण्यासाठी एकमेकांच्या सहकार्यासाठी देखील दोन्ही देशांनी धन्यवाद दिले आणि द्विपक्षीय करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या आणि आदान-प्रदान करण्यात आले. भारताने बांग्लादेशला विश्वास दिला की तो आपल्या शेजारी देशाच्या विकासात मजबूत सह-भागीदार म्हणून कायम राहील. या दौऱ्याचे महत्व बांग्लादेशला रवाना होण्यापूर्वी पंतप्रधान मोदी यांनी दिलेल्या संदेशातून देखील जाणवते, "मला आनंद आहे की कोविड-19 महामारी सुरु झाल्यापासून कुठल्याही शेजारी मित्र देशाचा हा माझा पहिलाच परदेश दौरा आहे, ज्याच्याबरोबर भारताचे सांस्कृतिक, भाषिक आणि दोन्ही देशांच्या लोकांमध्ये दृढ संबंध आहेत. " एवढेच नाही, त्यांनी बांग्लादेशी वृत्तपत्र 'द डेली स्टार' मध्ये "बंगबंधु बरोबर एका वेगळ्या दक्षिण आशियाची कल्पना" असे शीर्षक असलेला एक लेख देखील लिहिला. ज्यात पंतप्रधानांनी आश्वासन दिले कीं भारत नेहमी बांग्लादेशचा भागीदार राहील कारण दोन्ही देश स्वर्णिम भविष्याच्या दिशेने एकत्रितपणे पुढे जात आहे ज्यासाठी बंगबंधु, लाखों देशभक्त बांग्लादेशी आणिनिश्चितपणे हजारो भारतीयांनी पूर्ण प्रयत्न केले आहेत.

**सामायिक वारसा आणि समान आव्हाने** :बांग्लादेशच्या स्वातंत्र्याला 50 वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त ढाका इथे आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांनी भारत-बांग्लादेश संबंध, दोन्ही देशांचा सामायिक वारसा आणि समान उद्दिष्टांवर विस्तृतपणे मत मांडले. दोन्ही देशांच्या मजबूत संबंधांचा उल्लेख करताना पंतप्रधान म्हणाले की भारत आणि बांग्लादेश हे दोन्ही लोकशाही देश आहेत. ते म्हणाले, आपला वारसा देखील समान आहे, आपला विकास देखील समान आहे आपली उद्दिष्टे देखील समान आहेत आणि आपली आव्हाने देखील समान आहेत.पंतप्रधान मोदी यांनी 1971 मध्ये बांग्लादेशच्या स्वातंत्र्य लढाईत भारतीय सैन्याने दिलेल्या योगदानाची देखील प्रशंसा केली. यावेळी पंतप्रधानांनी आपल्या जीवनातील ते क्षण देखील सामायिक केले. कशा प्रकारे त्यांनी बांग्लादेशच्या स्वातंत्र्यासाठी सत्याग्रह केला होता. ते म्हणाले, "बांग्लादेशच्या स्वातंत्र्यासाठी संघर्षांत सहभागी होणे हे माझ्या आयुष्यातील प्रारंभिक आंदोलनांपैकी एक होते. माझे वय 20-22 वर्षांचे असेल जेव्हा मी आणि माझ्या अनेक सहकाऱ्यांनी बांग्लादेशच्या लोकांच्या स्वातंत्र्यासाठी सत्याग्रह केला होता."

**बांग्लादेशच्या स्वातंत्र्याच्या 50 व्या वर्षपूर्तीनिमित्त ढाका इथे दाखल झाले पंतप्रधान नरेंद्र मोदी**

पंतप्रधान मोदी यावेळी असेही म्हणाले की व्यापार आणि वाणिज्य क्षेत्रात दोन्ही देशांसाठी एक समान संधी आहे, त्याबरोबरच दहशतवादासारखी एक समान आव्हाने देखील आहेत. यावेळी पंतप्रधानांनी बांग्लादेशच्या 50 उद्योजकांना भारतात येऊन इथले स्टार्ट अप आणि नवसंशोधन तंत्राद्वारे संपर्क स्थापित करण्याचे आणि उद्योजकांना भेटण्याचे निमंत्रण देखील दिले. त्यांनी उभय देशांदरम्यान राजनैतिक संबंधांना 50 वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त बांग्लादेशी विद्यार्थ्यांसाठी स्वर्ण जयंती शिष्यवृत्तीची देखील घोषणा केली.

या समारंभात बंगबंधुना श्रद्धांजलि अर्पण करताना पंतप्रधान मोदी यांनी खास खादीचे बनवलेले काळ्या रंगाचे 'मुजीब जॅकेट ' देखील घातले. बांग्लादेशमध्ये अतिशय लोकप्रिय मुजीब जॅकेट, उंच गळ्याचा बिना बाह्यांचा पुरुषांनी परिधान करायचा कोट आहे. भारताच्या खादी ग्रामोद्योगने खास या समारंभासाठी 100 मुजीब जॅकेट तयार करून ढाका इथे पाठवली होती.



## जेशोरेश्वरी मंदिरात केली पूजा-अर्चना

पंतप्रधान मोदी यांच्या दोन दिवसांच्या दौऱ्यापूर्वी बांग्लादेश मधील सतखीरा स्थित जेशोरेश्वरी मंदिराचा जीर्णोद्धार करण्यात आला. अतिशय सुंदर रीतीने मंदिर सजवण्यात आले. हे मंदिर दुर्गामातेच्या 51 शक्तिपीठांपैकी एक आहे. या मंदिरात पंतप्रधानांनी कालीमातेची पूजा-अर्चा देखील केली. पंतप्रधानांनी ओराकान्दी इथे मतुआ समुदायाच्या प्रतिनिधींना देखील संबोधित केले. हे तेच स्थान आहे, जिथून श्री श्री हरि चंद ठाकुर जी यांनी सामाजिक सुधारणांशी संबंधित आपले पवित्र विचार आणि संदेश यांचा प्रसार केला होता.

## बांग्लादेशी नागरिकांच्या आरोग्याचीही चिंता:

या दौऱ्यादरम्यान पंतप्रधान मोदी यांनी राजकीय आणि समुदाय नेत्यांची देखील भेट घेतली, ज्यात अल्पसंख्यांकांचे प्रतिनिधि, बांग्लादेश मुक्ति संग्रामचे मुक्ति योद्धा यांचा समावेश होता. परराष्ट्र मंत्रालयाच्या माहितीनुसार पंतप्रधान

# विश्वासाचा मार्ग, दृढ होत असलेले संबंध



## संरक्षण क्षेत्रात परस्पर सहकार्य

2020 मध्ये दोन्ही देशांदरम्यान उच्च स्तरीय सहकार्य. भारतीय लष्कराने बांग्लादेशच्या लष्कराला प्रशिक्षित घोडे आणि श्वान भेट दिले. बांग्लादेश विजय दिवस निमित्त मुक्तियोध्यांच्या कुटुंबांना शिष्यवृत्तीसह त्यांच्यासाठी आरोग्य योजना सुरु करण्यात आली.

## सुरक्षा आणि सीमा व्यवस्थापन

- भारत-बांग्लादेश दरम्यान 4096.7 किमी ची सर्वात मोठी भू सीमा आहे, जी भारत आपल्या शेजारी देशाबरोबर सामायिक करतो , यात 1116.2 किमी सीमा नदी किनाऱ्याशी संबंधित आहे.
- सर्वोच्च स्तरावर बांग्लादेशच्या नेतृत्वाने भारताला आश्वासन दिले आहे की तो आपल्या भूमीचा वापर भारताविरोधात होऊ देणार नाही.
- जून 2015 मध्ये पंतप्रधान मोदी यांच्या बांग्लादेश दौऱ्याच्या वेळी लेखी पुष्टि नंतर दोन्ही देशांदरम्यान बांग्लादेश भूमि सीमा करार लागू झाला.
- 7 जुलै 2014 रोजी अंकलोस पांचाट अनुसार दोन्ही देशांदरम्यान सागरी सीमा मध्यस्थतेने बंगाल उपसागराच्या या भागाच्या आर्थिक विकासाचा मार्गप्रशस्त केला जो दोन्ही देशांसाठी लाभदायक आहे.
- दोन्ही देशांदरम्यान 54 नद्या समान रुपाने वाहतात. यापासून जास्तीत जास्त लाभ आणि संपर्क स्थापित करण्यासाठी जून 1972 पासून द्विपक्षीय संयुक्त नदी आयोग काम करत आहे. स्वाक्षरी झालेल्या गंगा जल करारावर आजही समाधानकारकरित्या अंमल होत आहे.

## कनेक्टिविटी

- 17 डिसेंबर 2020 रोजी दोन्ही देशांच्या पंतप्रधानांनी बांग्लादेशच्या चिल्हाटी इथून हल्दीबारी (भारत) दरम्यान रेल्वे लिंकचे उद्घाटन केले.
- दोन पॅसेंजर ट्रेन- मैत्री एक्सप्रेस आणि बंधन एक्सप्रेसच्या फेऱ्या वाढवण्यात आल्या आहेत.
- ऑक्टोबर 2019 मध्ये ढाका-सिलिगुड़ी-गंगटोक-ढाका आणि ढाका-सिलिगुड़ी-दार्जिलिंग-ढाका बस सेवा सुरु झाली.
- त्रिपुराला बांग्लादेशच्या रामगढ़शी जोडणाऱ्या मैत्री सेतुचा प्रारंभ 9 मार्च 2021 रोजी करण्यात आला.

## आर्थिक-वाणिज्यिक

- बांग्लादेश दक्षिण आशियात भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे आणि भारत त्याचा दुसरा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे
- गेल्या काही वर्षात भारतातून बांग्लादेशला तीन पट निर्यात झाली आहे. वर्ष 2019-20 मध्ये 8.2 अब्ज डॉलर इतकी निर्यात बांग्लादेशला करण्यात आली आणि 1.26 अब्ज डॉलर आयात झाली.
- वीज क्षेत्र दोन्ही देशांमधील सहकार्याची मोठी ओळख आहे. बांग्लादेश 1160 मेगावॅट वीज भारतातून आयात करत आहे.

## क्षमता निर्मिती आणि प्रशिक्षण

2019 पासून आतापर्यन्त बांग्लादेशच्या 1800 प्रशासकीय अधिकाऱ्यांना मसूरी स्थित राष्ट्रीय सुशासन केंद्रात प्रशिक्षण देण्यात आले. बांग्लादेशच्या पोलीस अधिकाऱ्यांबरोबर 2017 पासून आतापर्यन्त 1500 न्यायिक सेवेतील अधिकाऱ्यांनाही भारतात प्रशिक्षण देण्यात आले आहे. उच्च शिक्षणासाठी भारतात येणाऱ्या बांग्लादेशी विद्यार्थ्यांना दरवर्षी 200 शिष्यवृत्त्या दिल्या जातात.

मोदी यांनी सत्तारूढ़ महाआघाडीच्या नेत्यांची भेट घेतली, ज्यात त्यांनी दोन्ही देशांमधील संबंध मजबूत करण्यासाठी द्विपक्षीय संबंधांशी संबंधित विविध विषयांवर चर्चा केली. या दौऱ्यात बोहरा समुदायाच्या नेत्यांनी ढाका इथे पंतप्रधान मोदी यांची भेट देऊन कोरोना लसींबद्दल आभार मानले. या प्रतिनिधिमंडळाचे नेतृत्व अंजुमन-ए-जमातचे सचिव कय्यूम दीसावाला यांनी केले. बैठकीनंतर कय्यूम दीसावाला म्हणाले की पंतप्रधान मोदी यांनी बोहरा समुदायाच्या लोकांशी गुरटी भाषेत संवाद साधला. मैत्रीबरोबर12 लाख कोरोना लसींची नवी खेप घेऊन स्वतः पंतप्रधान मोदी बांग्लादेशमध्ये दाखल झाले होते, ज्यात केवळ मैत्री आणि भागीदारीचा संदेश नव्हता तर सामान्य बांग्लादेशी नागरिकांच्या आरोग्याच्या चिंतेचा देखील संदेश होता.

### सहकार्य आणि संवादातून संबंधांचे बळकटीकरण

कोरोना सारख्या प्रतिकूल परिस्थितीतही बांग्लादेश बरोबर भारताच्या संबंधांमध्ये आत्मीयता कायम राहिली आहे. पंतप्रधान मोदी आणि बांग्लादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी नववर्षानिमित्त एकमेकांना शुभेच्छा दिल्या. तर यापूर्वी 17 मार्च 2020 रोजी शेख मुजीबुर्रहमान यांच्या जन्मशताब्दी वर्षासाठी पंतप्रधान मोदी यांनी

## बांग्लादेश मध्ये भारतीय समुदाय

एका अंदाजानुसार बांग्लादेशमध्ये भारतीय समुदायाचे 10 हजार लोक राहतात, ज्यांची मेहनत आणि व्यवस्थापन कौशल्याने शेजारी देशात त्यांना सन्मान मिळवून दिला आहे. बहुतांश भारतीय समुदाय रेडीमेड गारमेंटच्या व्यवसायाशी जोडलेला आहे किंवा बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये सर्वोच्च पदांवर आहे. भारतीय समुदाय तिथे वेळोवेळी इंडियन एसोसिएशन आणि ढाका एसोसिएशन बरोबर एकत्रितपणे सांस्कृतिक समारंभाचे आयोजन करत आला आहे

व्हिडिओ संदेश दिला आणि 29 एप्रिलच्या रमजान आणि 25 मे च्या ईद निमित्त शुभेच्छा दिल्या. 17 डिसेंबर 2020 रोजी दोन्ही पंतप्रधानांनी द्विपक्षीय चर्चा केली. या चर्चेदरम्यान हाइड्रोकार्बन, कृषी, व्यापार, विकास प्रकल्प आणि वारसा संरक्षण बाबत सामंजस्य करार झाले. यावेळी दोन्ही पंतप्रधानांनी बंगबंधू शेख मुजीबुर्रहमान यांच्यावर भारत सरकारच्या वतीने समर्पित स्मृती टपाल तिकीट जारी केले. राजशाही शहर आणि खुलना येथे खालीसपुर कॉलेजिएट छात्रा स्कूलचे उद्घाटन करण्यात आले. 29 सप्टेंबर 2020 रोजी दोन्ही देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांनी संयुक्तपणे महात्मा गांधी यांच्या 150 व्या जयंती निमित्त बांग्लादेश सरकारच्या वतीने जारी टपाल टिकट समर्पित केले. 30 मे 2019 रोजी पंतप्रधान मोदी यांच्या शपथविधी समारंभात सहभागी होण्यासाठी बांग्लादेशचे राष्ट्रपति मो. अब्दुल हामिद खास उपस्थित होते. यापूर्वी 3-6 ऑक्टोबर 2019 रोजी बांग्लादेशच्या पंतप्रधान शेख हसीना अधिकृत दौऱ्यावर भारतात आल्या होत्या. 22 नोव्हेंबर 2019 रोजी त्यांनी कोलकाताचा देखील दौरा केला. या दौऱ्याच्या वेळी भारत-बांग्लादेश दरम्यान गुलाबी चेंडूचा वापर झालेल्या कसोटी क्रिकेट सामन्याला त्या उपस्थित राहिल्या. संयुक्त राष्ट्राच्या सर्वसाधारण बैठकी दरम्यान सप्टेंबर 2019 मध्ये दोन्ही देशांच्या पंतप्रधानांनी महात्मा गांधी यांच्या 150 व्या जयंती निमित्त आयोजित समारंभात भाग घेतला होता. बहुआयामी आणि विविध विषयांवर दोन्ही देशांमध्ये सातत्याने चर्चा होत असते, ज्यात पर्यटन, आरोग्य, शिक्षण, अणुविज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान यांचा समावेश आहे. बांग्लादेशच्या पंतप्रधान शेख हसीना यांनी तत्कालीन राष्ट्रपति प्रणब मुखर्जी यांच्या पत्नीवरील अंतिम संस्कारात भाग घेण्यासाठी 19 ऑगस्ट 2015 रोजी नवी दिल्लीचा खास दौरा केला होता.

**बांग्लादेशच्या राष्ट्रीय दिवस समारंभात पंतप्रधानांनी केलेले संपूर्ण भाषण ऐकण्यासाठी QR कोड स्कॅन करा.**

# बंगबंधु आणि बिन अल सैद यांना गांधी शांतता पुरस्कार

**बांग्लादेशचे राष्ट्रपिता म्हणून ओळखले जाणारे शेख मुजीबुर्रहमान यांच्या जन्मशताब्दी निमित्त भारताने 2020 वर्षासाठी त्यांना गांधी शांतता पुरस्कार देऊन गौरवले. तर 2019 साठी हा पुरस्कार ओमानचे (दिवंगत) महामहिम सुल्तानकाबूस बिन सैद अल सैद यांना देण्यात आला.**



## 'मुजीब वर्ष' मध्ये बंगबंधु यांच्या संघर्षाचा सन्मान

असे म्हटले जाते की जर शेख मुजीबुर्रहमान नसते तर बांग्लादेशचा उदय देखील झाला नसता. गांधीवादी मार्गाने चालताना सामाजिक आणि राजकीय परिवर्तनाची जी दिशा त्यांनी दिली त्यासाठी बांग्लादेशच्या जनतेने त्यांना 'बंगबंधु' ही उपाधि दिली. या पार्श्वभूमीवर बांग्लादेश 'मुजीब वर्ष' साजरे करत असताना भारताने देखील बांग्लादेश सरकार आणि तेथील जनतेबरोबर एकत्रपणे त्यांच्या वारसाचे स्मरण करत शेख मुजीबुर्रहमान यांना गांधी शांतता पुरस्कार दिला. गांधी शांतता पुरस्कार भारत सरकार द्वारा दिला जाणारा एक वार्षिक पुरस्कार आहे जो 1995 पासून प्रदान केला जात आहे. या पुरस्काराची सुरुवात महात्मा गांधी यांच्या 125 व्या जयंती निमित्त करण्यात आली होती.

## भारत-ओमान संबंधांचे शिल्पकार काबूस



महामहिम सुल्तान काबूस एक दूरदर्शी नेते होते ज्यांच्या आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवरील तोडग्यांमध्ये संयम आणि मध्यस्थीच्या दुहेरी धोरणाने त्यांना जगभरात प्रशंसा आणि सन्मान मिळवून दिला. त्यांनी विविध क्षेत्रीय विवाद आणि संघर्षांमध्ये शांतता प्रयत्नांचे समर्थन करण्यात महत्वपूर्ण भूमिका पार पाडली. महामहिम सुल्तान काबूस भारत आणि ओमान दरम्यान विशेष संबंधांचे शिल्पकार होते. त्यांनी भारतात शिक्षण घेतले होते आणि नेहमी भारताबरोबर एक विशेष संबंध कायम ठेवले. त्यांच्या नेतृत्वात भारत आणि ओमान धोरणात्मक भागीदार बनले.



# सदैव देशाच्या सेवेत...


*"आपण फक्त करियर किंवा फक्त नोकरीसाठी या मार्गावर आला नाही. आपण येथे सेवा परमोम धर्माच्या मंत्राने सेवा देण्यासाठी आला आहात, आपले एक पाऊल, एक हस्ताक्षर लाखो लोकांच्या जीवनावर परिणाम करेल. आपल्या निर्णयाचा देशावर कसा परिणाम होईल याचा आपण नेहमी विचार केला पाहिजे.*

— **नरेंद्र मोदी, पंतप्रधान** (31 अक्टूबर 2020)

**21 एप्रिल 1947 रोजी दिल्लीच्या मेटकॉफ हाऊसमध्ये प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांच्या पहिल्या तुकडीला संबोधित करताना सरदार वल्लभभाई पटेल यांनी त्यांना 'स्टील फ्रेम ऑफ इंडिया' म्हटले होते. कारण सरकारच्या धोरणांचे प्रत्यक्षात कार्यान्वयन करण्यात यांचीच भूमिका अतिशय महत्त्वाची असते...**

नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या पिकांच्या नुकसानाबद्दल योग्य प्रकारची नुकसानभरपाई देण्यासाठी केंद्र सरकारने पंतप्रधान पीक विमा योजना सुरु केली. पण ही योजना प्रत्यक्षात लाभार्थींपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनांची होती आणि त्रिपुराच्या पश्चिम त्रिपुरा जिल्हा प्रशासनाने या संदर्भात अपेक्षेपेक्षा जास्त चांगले काम केले. सोशल आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या मदतीने प्रचार करुन या योजनेची अतिशय योग्य माहिती प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत पोहोचवण्यात आली जेणेकरुन त्यांना योग्य प्रकारे याचा लाभ मिळू शकेल. अशाच प्रकारे हरयाणाच्या सोनीपतचे उदाहरण देखील अनुकरणीय आहे. जिल्हा प्रशासनाकडून चालवल्या गेलेल्या सक्षम युवा कार्यक्रमाचे सकारात्मक परिणाम दिसू लागले असून पूर्वी केवळ 4 टक्के लोक वीजेची देयके ऑनलाईन भरत होते पण आता त्यांची संख्या 88 टक्क्यांवर गेली आहे. डिजिटल पेमेंटविषयी लोकांना जागरुक करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने 10 लाखांपेक्षा जास्त एसएमएस पाठवले, व्हिडियो आणि सोशल मिडियाच्या माध्यमातून देखील प्रचार करण्यात आला. या अनुकरणीय उदाहरणांबद्दल दोघांनाही 2018 मध्ये 'प्राईम मिनिस्टर ऍवॉर्ड फॉर एक्सलन्स इन पब्लिक ऍडमिनिस्ट्रेशन' ने देखील सन्मानित करण्यात आले आहे. प्रत्यक्षात सरकार सर्वसामान्य जनतेसाठी ज्या योजना तयार करते त्या योजना प्रत्यक्षात तळागाळापर्यंतच्या जनतेपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी प्रशासकीय अधिकाऱ्यांचीच असते. नागरी सेवेतील अधिकाऱ्यांना संबोधित करताना एकदा पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले होते, " नोकरशाही आणि व्यवस्था हे दोन शब्द असे बनले आहेत ज्यांना वाईट नोकरशाही किंवा वाईट व्यवस्था असे लिहिण्याची गरज भासत नाही.ही प्रतिमा बदलण्याची सुरुवात 2014 पासून झाली आहे. त्यामुळेच केंद्रीय योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यामध्ये यश मिळाले आहे. नागरी सेवा दिवसाच्या निमित्ताने जनसेवेच्या भावनेने काम करणाऱ्यांनायासाठी 'प्राईम मिनिस्टर ऍवॉर्ड फॉर एक्सलन्स इन पब्लिक ऍडमिनिस्ट्रेशन' पुरस्कार देखील देण्यात येतात. तसे

**येणाऱ्या 25 वर्षात जागतिक पातळीवर भारताचे स्थान काय असेल याचे उत्तरदायित्व आपल्या प्रशासकीय सेवेतील अधिकाऱ्यांवरच आहे.**



***" लोकसेवा हाच सरकारचा प्रत्यक्ष चेहरा आहे कारण सर्वच सेवांसाठी नागरिकांची गाठ त्यांच्याशी पडत असते. सरकारची प्रतिमा देखील बऱ्याच मोठ्या प्रमाणात लोकसेवकांच्या याच वृत्तीवर अवलंबून असते की ते लोकांच्या गरजा आणि त्यांच्या अपेक्षांची पूर्तता कशा प्रकारे करतात"*** - सरदार वल्लभ भाई पटेल





**नागरी सेवेचा इतिहास** ..... नागरी सेवा( सिविल सर्विस) हा शब्द ब्रिटिश काळात आला होता आणि या सेवेत काम करणाऱ्या लोकांना 'लोकसेवक' म्हणून ओळखले जात होते. याचा पाया वॉरन हेस्टिंग्ज यांनी घातला होता. नंतर चार्ल्स कॉर्नवॉलिस यांनी यात आणखी सुधारणा केल्या. प्रशासकीय व्यवस्था सांभाळणारी नोकरशाही इंग्रज राजवटीच्या नियंत्रणातून मुक्त झाली आणि सरदार वल्लभभाई पटेल यांनी इंडियन सिविल सर्विस पासून इंडियन ॲडमिनिस्ट्रेटीव्ह सर्विस ची स्थापना केली.

## राष्ट्रीय नागरी सेवा दिवस साजरा करण्याचा उद्देश

- नागरी सेवाअधिकाऱ्यांचे कार्य आणि प्रयत्नांना प्रेरित करणे आणि त्यांची प्रशंसा करणे. केंद्र सरकार या संधीचा वापर नागरी सेवे अंतर्गत विविध विभागांमध्ये कामांचे मूल्यमापन करण्यासाठी करत असते.
- सर्वात चांगले काम करणाऱ्या व्यक्ती आणि समूहांना केंद्र सरकार पुरस्कार देते. या दिवशी जास्त करून केंद्र आणि राज्य सरकारांमधील अधिकाऱ्यांना पंतप्रधानांकडून लोक प्रशासन क्षेत्रात त्यांच्या असामान्य सेवेबद्दल सन्मानित केले जाते.
- सरकारने भूमिका आधारित दृष्टीकोनावर बराच भर दिला आहे. याचे परिणाम देखील दिसत आहेत. नागरी सेवांमध्ये क्षमता आणि सामर्थ्य निर्माण करण्यासाठी नवी संरचना निर्माण झाली आहे. शिकण्याच्या पद्धतींचे लोकशाहीकरण झाले आहे. प्रत्येक अधिकाऱ्यासाठी त्याची क्षमता आणि अपेक्षांच्या तुलनेत त्यांचे दायित्व देखील निश्चित होत आहे.

## असा झाला पुरस्कारांमध्ये बदल

**आता सरकारचे प्रमुख कार्यक्रम आणि नवोन्मेष या श्रेणीत देखील पुरस्कारांची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रमुख कार्यक्रमांमध्ये पंतप्रधान पीक विमा योजना, दीनदयाळ उपाध्याय कौशल्य योजना आणि डिजिटल पेमेंट सारख्या प्राधान्यक्रमाच्या कार्यक्रमांसाठी देखील पुरस्कार देण्यात आले आहेत. हे प्राधान्यक्रमाचे कार्यक्रम नवभारतासाठी महत्त्वाचे आहेत. ज्या योजनांसाठी हे पुरस्कार देण्यात येत आहेत त्या नवभारतासाठी आपली जी स्वप्ने आहेत, ती पूर्ण करण्यासाठी अतिशय महत्त्वाच्या आहेत.**

पाहायला गेले तर नागरी सेवा दिवस अनेक वर्षांपासून साजरा करण्यात येत आहे. पण 2014 पासून त्याचे स्वरुप बदलले आहे. आता भारताच्या शैक्षणिक दिनदर्शिकेमध्ये हा दिवस महत्त्वाचा दिवस बनला आहे. यामध्ये वेगवेगळ्या सत्रांमध्ये वेगवेगळ्या विषयांवर चर्चा आयोजित करण्यात येतात. त्याच प्रकारे पुरस्कारांच्या श्रेणीतही बदल करण्यात आले आहेत. पूर्वी कोणत्याही अधिकाऱ्याला त्याच्या कामगिरीच्या आधारावर पुरस्कार दिले जात होते मात्र आता सरकारच्या प्रमुख कार्यक्रमांच्या आधारावर देखील पुरस्कार दिले जाऊ लागले आहेत. यामुळेच 2016 मध्ये एकीकडे केवळ 74 जिल्ह्यांकडून प्रस्ताव प्राप्त झाले होते त्यात 2017 मध्ये वाढ होऊन 599 जिल्ह्यांनी यात भाग घेतला. 2018 मध्ये त्यात आणखी वाढ झाली आणि त्यांची संख्या 643 झाली. 2017 मध्ये 599 जिल्ह्यांमधून 2345 प्रस्ताव आले होते तर 2018 मध्ये 643 जिल्ह्यांमधून 3009 प्रस्ताव आले. यापैकी एक तृतीयांश प्रस्ताव केवळ नवोन्मेषाच्या श्रेणीतून आले होते. 2020 मध्ये देशातील एकूण 736 जिल्ह्यांपैकी 702 जिल्हे यात सहभागी झाले होते.

# आयुष्य आणि पर्यावरण संरक्षणाची अद्वितीय मोहीम



आयुष्यासोबतच पर्यावरणाचे आपले विशेष महत्व आहे. आपले आयुष्य जेवढे महत्वाचे, तेवढेच पर्यावरणाचे संरक्षणही महत्वाचे आहे लोकांचे आयुष्य वाचवण्याचे काम करत आहेत, राघवेंद्र- जे लोकांना हेल्मेट देऊन रस्ते अपघातांपासून त्यांचे संरक्षण करत आहेत. तर दुसरीकडे एन.एस. राजप्पन यांनी तलावातून कचरा काढण्याच्या काढण्याची मोहीम सुरु करत पर्यावरण रक्षणाच्या कामात स्वतःला झोकून दिले आहे..

## पुस्तकाच्या बदल्यात हेल्मेट देऊन वाचवत आहेत लोकांचे आयुष्य



एका रस्ते अपघातात आपला मित्र गमवल्यानंतर राघवेंद्र यांनी अशा अपघातांमधून लोकांचा जीव वाचवण्यासाठी वाराणसी इथे लोकांना हेल्मेट देण्याची मोहीम सुरु केली आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे, लोक आता त्यांना 'हेल्मेट मॅन' म्हणून ओळखतात आणि त्यांची ही मोहिम आणि ते लोकांच्या कुतूहलाचा, चर्चेचा विषय बनले आहेत. विशेष म्हणजे, लोकांना हेल्मेट देण्याच्या बदल्यात राघवेंद्र त्यांच्याकडून एक पुस्तक घेतात. एवढेच नाही, तर ते लोकांना हेल्मेट देऊन त्यांना शपथही घ्यायला लावतात की ते कधीही विना-हेल्मेट गाडी चालवणार नाही आणि इतरांनाही हेल्मेट घालण्याबाबत जागरुक करतील. बद्दल जागृत करतील. एकदा, एका रस्ते अपघातात राघवेंद्र यांच्या मित्राचा मृत्यू झाला कारण त्याने त्यावेळी हेल्मेट घातली नव्हती. या घटनेने राघवेंद्र यांना पुरते हादरवून टाकले आणि त्यांनी निश्चय केला की ते हेल्मेटबद्दल जनजागृती करतील. त्यांनी आपली नोकरीही सोडून दिली आणि लोकांना मोफत हेल्मेट वाटण्याची मोहीम सुरु केली. एका सर्वेक्षणानुसार, देशात दरवर्षी रस्ते अपघातात दीड लाख लोकांचा मृत्यू होतो, यापैकी 50 हजार लोक असे असतात, जे हेल्मेट न घातल्यामुळे अपघातात मारले जातात.

## तलावातून कचरा काढत, पर्यावरण संरक्षणाच्या माध्यमातून लोकांचे आयुष्य करत आहेत सुखकर



केरळ च्या कोट्टयम इथले रहिवासी एन. एस. राजप्पन दिव्यांग आहेत, ते चालू शकत नाहीत. मात्र, असे असले तरीही गेल्या सहा वर्षांपासून दररोज न चुकता नावेत बसून वेंबनाड तलावात जातात. तिथून प्लास्टिकचा कचरा काढून बाहेर फेकतात. राजप्पन यांच्या गुडघ्याखालचे शरीर अर्धांगवायूमुळे लुळे पडले आहे, त्यामुळे ते चालू शकत नाहीत. असे असले तरी दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर ते आपल्या हातांच्या मदतीने पुढे जातात आणि तलावातून कचरा बाहेर काढतात. अलीकडेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' या कार्यक्रमात एन एस राजप्पन यांचे काम आणि स्वच्छतेविषयीच्या त्यांच्या कटीबद्धतेचे कौतुक केले होते. खरे तर, बेम्बनाड तलावाच्या सौंदर्यामुळे जगभरातील पर्यटक त्याच्याकडे आकर्षित होतात. राजप्पन यांच्या या अथक प्रयत्नांमुळेच हा तलाव आज त्याच्या स्वच्छतेसाठी ओळखला जातो. आपल्या या कामामुळे एन. एस राजप्पन आज इतर लोकांसाठी प्रेरणास्त्रोत बनले आहेत.




# 67 वे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार-2019

**67 व्या राष्ट्रीय पुरस्कारांची घोषणा 3 मे 2020 रोजी होणार होती. मात्र, कोरोना महामारीमुळे त्याला एक वर्ष पुढे ढकलण्यात आले होते. 22 मार्च 2021 रोजी राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांच्या ज्युरी ने 2019 या वर्षासाठीच्या राष्ट्रीय पुरस्कारांची घोषणा केली.**



## कंगना रानावत

हिला सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा पुरस्कार माणिकर्णिका-द क्वीन ऑफ झांसी आणि पंगा साठी ..

*कंगनाने माणिकर्णिका चित्रपटात मुख्य भूमिका केली आहे त्याशिवाय चित्रपटाचे दिग्दर्शनही तिने केले आहे. तसेच पंगा चित्रपटातही तिने अभिनय केला आहे. याआधी कंगना रानावतने तीन वेळा सर्वोत्कृष्ट अभिनेत्रीचा राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार जिंकला आहे.*



**सर्वाधिक चित्रपट स्नेही राज्य :**

**सिक्किम**





**मनोज वाजपेयी:** *सर्वोत्कृष्ट अभिनेता, भोसले चित्रपटासाठी*

**धनुष:** *सर्वोत्कृष्ट अभिनेता, 'असुरन' चित्रपटासाठी*

**विजय सेतुपति:** *सर्वोत्कृष्ट सहअभिनेता, तमिळ चित्रपट 'सुपर डिलक्स' साठी*

**पल्लवी जोशी:** *सर्वोत्कृष्ट सहअभिनेत्री 'द ताश्कंद फाईल्स' चित्रपटासाठी*

**बी. प्राक:** सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक , चित्रपट केसरी, गीत : तेरी मिट्टी मे....

**सावनी रवींद्र :** *सर्वश्रेष्ठ पार्श्वगायक, मराठी चित्रपट बार्डो*

**सर्वोत्कृष्ट हिंदी चित्रपट :** *सुशांत सिंह राजपूत अभिनित चित्रपट "छीछोरे"*



*पुरस्कारांची पूर्ण यादी बघण्यासाठी खाली दिलेल्या लिंकवर क्लिक करा:*

https://static.pib.gov.in/WriteReadData/specificdocs/documents/2021/mar/doc202132211.pdf

## थलैवाचा दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मान

**दक्षिण भारत आणि चित्रपटसृष्टीत थलैवा या अनावाने सुपरिचित असलेले सुपरस्टार रजनीकांत यांना वर्ष 2019 साठीचा 51 वा दादासाहेब फाळके पुरस्कार देण्याची घोषणा करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, पाच सदस्यीय ज्युरीने सर्वसंमतीने त्यांच्या नावाची निवड केली. भारतात पहिला चित्रपट "राजा हरिश्चंद्र" बनवून चित्रपटसृष्टीची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या दादासाहेब फाळके यांच्या नावाने दरवर्षी केंद्र सरकारतर्फे हा पुरस्कार दिला जातो. पंतप्रधानांनी ट्वीट करुन रजनीकांत यांना शुभेच्छा देत म्हटले- "अनेक पिढ्यांमध्ये लोकप्रिय, विविध भूमिका साकार करणारे, एक स्थिर व्यक्तिमत्व.... म्हणजे आपल्या सगळ्यांचे रजनीकांत ! त्यांचे खूप अभिनंदन !!!!"**





# "कचऱ्यातून सोने तर आपण सगळ्यांनीच ऐकले आहे, आता कचऱ्याला आणखी मौल्यवान करण्याचे काम देखील केले जात आहे."

***हा एक विशेष योगायोग आहे की जेव्हा देश स्वातंत्र्याला 75 वर्षे पूर्ण होत असल्याबद्दल स्वातंत्र्याचा 'अमृत महोत्सव'साजरा करत आहे, त्याचवेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या देशबांधवांशी मासिक संवाद साधण्याच्या 'मन की बात' या कार्यक्रमाचे 75 भाग पूर्ण झाले आहेत. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंतप्रधानांनी जनतेचे आभार मानले आहेत. तसेच या भागात, त्यांनी कोरोनाविरुद्धची लढाई, नारी शक्तीच्या प्रेरणेसह 'आत्मनिर्भर भारता'च्या अभियानादरम्यान लोकांचा दृष्टीकोन बदलणाऱ्या अनेक प्रेरक कथा देखील सांगितल्या आहेत.....***

- **जनता कर्फ्यू :** गेल्या वर्षी मार्च महिन्यात जनतेने कर्फ्यू विषयी ऐकले होते, हा जनता 'कर्फ्यू म्हणजे' सामूहिक शिस्तीचे एक अभूतपूर्व उदाहरण होते.आज ही आपल्यासाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे की भारतात जगातली सर्वात मोठी लसीकरण मोहीम सुरु आहे. आमच्या कोरोना योद्ध्यांचा सन्मान, थाळ्या वाजवणे, टाळ्या वाजवणे, दिवे लावणे हे ही आपण सर्वांनी केले. आपल्याला अंदाज नाही की या सर्व गोष्टी या कोरोना योद्ध्यांना किती बळ देणाऱ्या ठरल्या होत्या.

- **अमृत महोत्सव :** अमृत महोत्सव दांडी यात्रेच्या दिवसापासून सुरु झाला होता आणि तो 15 ऑगस्ट 2023 पर्यंत चालणार आहे. स्वातंत्र्यसंग्रामात आमच्या सैनिकांनी देशासाठी अपरिमित कष्ट झेलले होते. त्यांचा त्याग आणि बलिदानाच्या अमर कहाण्या आजही आपल्याला आपल्या कर्तव्यपथावर जाण्यासाठी प्रेरणा देत असतात.

- **नारी शक्ती :** भारतात नारी शक्तीसाठी खेळ हा एक अत्यंत आवडता पर्याय आहे. अलीकडेच, आपली क्रिकेटपटू मिताली राज 10,000 धावा करणारी भारतातली पहिली महिला खेळाडू ठरली. आज शिक्षणापासून ते उद्योगक्षेत्र, सशस्त्र दल. विज्ञान आणि तंत्रज्ञान यासह देशाच्या कन्या प्रत्येक क्षेत्रात आपले वेगळे स्थान निर्माण करत आहेत.

- **मधुक्रांती :** मधुक्रांतीसाठी मधुमक्षिका पालन अग्रणी ठरले आहे. ही मोहीम आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीसाठी उपयुक्त ठरते आहे. बनासकांठा येथे शेतकऱ्यांनी एक नवा अध्याय लिहिला आणि आज हे ठिकाण मध उत्पादनाचे एक प्रमुख केंद्र बनले आहे. संपूर्ण जग आज आयुर्वेद आणि नैसर्गिक आरोग्य उत्पादनांकडे बघते आहे आणि मधाची मागणी जलद गतीने वाढते आहे. ज्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ झाली आहे.

- **लाईट हाउस पर्यटन :** पर्यटनाला चालना देण्यासाठी 71 दीपस्तंभ निश्चित करण्यात आले आहेत. यात संग्रहालय, कॅफेटेरिया, चिल्ड्रेन पार्क अशी मनोरंजनासाठीची साधने त्यांच्या क्षमतेनुसार बनवली जाणार आहेत. गुरु प्रसाद जी यांनी 2019 साली चेन्नई आणि महाबलीपुरम इथल्या दीपस्तंभांच्या वारसा म्युझियमच्या यात्रेविषयी चर्चा केली.हे दीपस्तंभ देशाच्या सागरी दिशादर्शनाचा इतिहास सांगणारे आहेत.

- **प्रेरक कथा :** काही दिवसांपूर्वी जागतिक चिमणी दिन साजरा करण्यात आला. बनारस येथे राहणारे इंद्रपाल सिंह बत्रा जी यांनी आपल्या घरात लाकडाची अशी घरटी तयार केली आहेत, ज्यात चिमण्या सहज येऊन राहू शकतात.

  **कार्बी भाषा :** कार्बी ॲनॉलांग गावाचे रहिवासी सिकारी टीस्सौ गेल्या 20 वर्षांपासून कार्बी भाषा जतन करण्याचे काम करत आहेत. त्यांच्या या प्रयत्नांमुळेच कारबी भाषा पुन्हा मुख्य प्रवाहात परत आली आहे.

  **कचऱ्यातून सोने :** विजयवाडा येथील प्रो. श्रीनिवास पदकांडला जी यांनी ऑटोमोबाईल च्या कचऱ्यापासून मूर्ती (शिल्प) तयार केल्या आहेत. त्यांच्या या विशाल मूर्ती सार्वजनिक उद्यानांमध्ये लावण्यात आल्या आहेत आणि लोक अत्यंत उत्साहाने ही शिल्पे बघायला येतात. केरळच्या कोच्ची इथल्या सेंट तेरेसा कॉलेजचे विद्यार्थी अत्यंत कलात्मक पद्धतीने पुनर्वापरयोग्य खेळणी तयार करत आहेत. हे विद्यार्थी जुने कपडे, फेकलेले लाकडी तुकडे, बैग आणि बॉक्सेसपासून खेळणी तयार करत आहेत. तामिळनाडू च्या कोईमतूर येथे बस कंडक्टरचे काम करणारे मरिमुथु योगनाथन सर्व प्रवाशांना तिकीटासोबत एक रोपटेही भेट देतात. त्यासाठी आपल्या पगारातली मोठी रक्कम ते खर्च करतात.

'मन की बात' पूर्ण ऐकण्यासाठी QR कोड स्कॅन करा



**PMO India** @PMOIndia · 6d

मोतुवा संप्रदायाचे आमचे बंधू-भगिनी श्री श्री हरिचंद ठाकूर यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी "बारोनी स्नान उत्सव" साजरा करतात.

भारतभरातून मोठ्या संख्येने भाविक ह्या उत्सवात सहभागी होण्यासाठी ओराकांदी येथे येतात: पंतप्रधान
@narendramodi



**Rajnath Singh**

"माझ्या लखनौ या मतदारसंघात वाहतूक कोंडीपासून मुक्तता मिळवण्यासाठी गेल्या काही वर्षात उड्डाणपूल बांधण्यात आले आहेत. याच मालिकेत आज आणखी एका उड्डाणपुलाचे लोकार्पण केले जाणार आहे आणि एका नव्या पुलाची कोनशिला देखील ठेवली जाणार आहे. हे उड्डाणपूल बनल्यामुळे जनतेला वाहतुकीची मोठी सुविधा उपलब्ध होईल."



**Amit Shah**

स्वातंत्र्याच्या इतिहासात हुतात्मा भगत सिंग, सुखदेव आणि राजगुरु यांचे शौर्य आणि योगदान शब्दांत वर्णन करणे शक्य नाही. देशाला पारतंत्र्याच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठीची त्यांची धडपड आणि बलिदानाचे स्मरण केल्यावर आजही भारतीयांच्या डोळ्यात पाणी येते.
अशा वीर हुतात्म्यांच्या चरणी कोटी कोटी वंदन !



**Nitin Gadkari**

2020-21 या वर्षात भारताने जगात सर्वाधिक महामार्ग निर्मिती केली आहे. भारताच्या पायाभूत विकासाला या उंचीवर पोहोचवण्यासाठी सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यानी अथक परिश्रम केले आहेत. त्या सर्वांचे अभिनंदन
#PragatiKaHighway



**Thawarchand Gehlot**

देशात सामाजिक समरसता स्थापन करण्यात अग्रगण्य भूमिका पार पाडत त्यासाठी सर्वस्वाचे दान करणारे आणि समाजाचत शेवटच्या रांगेत बसलेल्या लोकांचे कल्याण आणि त्यांच्या न्यायासाठी आवाज उठवणारे महानायक डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती, 14 एप्रिल हा दिवस राष्ट्रीय सुट्टी म्हणून घोषित करण्यात आला आहे.



**Gajendra Singh Shekhawat**

जल जीवन अभियानाने पार केला मैलाचा टप्पा. 15 ऑगस्ट 2019 पासून या अभियानाची सुरुवात झाली तेव्हापासून आजपर्यंत 4.01 कोटींपेक्षा जास्त ग्रामीण घरांमध्ये नळाद्वारे शुद्ध पाणी पोहोचवण्यात आले आहे.
एकूण 7.24 कोटी (37.78 %) ग्रामीण कुटुंबांना मिळत आहे शुद्ध पाणी
#HarGharJal
#JalJeevanMission



# ढाका से मोदी का संदेश, ये दोस्ती हम नहीं तोड़ेंगे...

# कृषि क्षेत्र में आधुनिकीकरण समय की जरूरत : मोदी

# भारत ने फिजी को भेजी कोरोना वैक्सीन की एक लाख खुराकें

# कृषि क्षेत्र में फौरन सुधार की जरूरत : मोदी

# सवाल था टीका कब आएगा, अब सबसे बड़ा अभियान भारत में: मोदी

पीएम ने कहा- 'दवाई भी, कड़ाई भी' यह मंत्र याद रखिए

# अहम रक्षा सौदों पर मुहर लगाएंगे भारत-अमेरिका

RNI No. : DELMAR/2020/78830
April: 16-30, 2021

NEW INDIA SAMACHAR FORTNIGHTLY

RNI Registered No DELMAR/2020/78830, Delhi Postal License No DL(S)-1/3553/2020-22, WPP NO U (S)-101/2020-22 posting at BPC, Meghdoot Bhawan, New Delhi - 110 001 on 13-17 advance Fortnightly (Publishing Date April 05, 2021, Pages - 44)


## बियाणांपासून ते बाजारापर्यंतची

# विकास यात्रा

## नैनितालचे शेतकरी खीमानंद यांच्या पत्राचे पंतप्रधानांनी दिले उत्तर

**प्रिय खीमानंद जी,**

कृषीसह विविध क्षेत्रात सुधारणा आणि देशाला विकासाच्या नव्या उंचीवर घेऊन जाण्यासाठी सरकारच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांवर आपण आपले बहुमूल्य विचार आमच्यापर्यंत पोहोचवलेत याबद्दल आपले मनःपूर्वक आभार. शेतकरी हिताच्या पीक विमा योजनेचा लाभ आज कोट्यवधी शेतकरी घेत आहेत. गेल्या पाच वर्षात, व्यापक विस्तार आणि पारदर्शीपणे दाव्यांचे निराकरण करण्याच्या प्रक्रियेच्या माध्यमातून ही योजना, आज शेतकरी कल्याणाला समर्पित आमचे प्रयत्न आणि पक्के इरादे यांचे आदर्श उदाहरण म्हणून लोकांसमोर आली आहे. आज बियाणांपासून ते बाजारापर्यंतच्या प्रवासात शेतकऱ्यांच्या सर्व छोट्या-मोठ्या अडचणी दूर करणे आणि अन्नदात्याची समृद्धी तसेच कृषीची प्रगती सुनिश्चित करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. सर्वांगीण विकासाच्या दृष्टीकोनासह आज देश एक सशक्त, समृध्द आणि आत्मनिर्भर भारताच्या उभारणीकडे जलद गतीने वाटचाल करतो आहे.



Marathi

**Editor**
**Jaideep Bhatnagar**, Principal Director General, PIB, New Delhi

**Published & Printed by: Satyendra Prakash**, Principal Director General, BOC on behalf of Bureau of Outreach and Communication

**Published from Bureau of Outreach and Communication, 2nd Floor, Soochna Bhawan, New Delhi -110003**

**Printed at** Viba Press Pvt Ltd. C-66/3, Okhla Ind Area Phase-II, New Delhi 20